






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
सौ. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अ‍ॅण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०१.०५.२०२६ | अंक नं. ०२७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०२.०५.२०२६ | अंक नं. ०२७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020




SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज







# शेतात काम करणाऱ्या महिलेला मारहाण करत चाकुचा धाक दाखवून सोन्याचे दागिने पळविले

## वारुळाचा मारुती परिसरातील घटना, जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु

नगर – शेतात काम करत असलेल्या महिलेला मारहाण करत आणि चाकूचा धाक दाखवत तिच्या गळ्यातील आणि कानातील सोन्याचे दागिने तिघा अनोळखी चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना शहरातील नालेगाव भागातील वारुळाचा मारुती परिसरात ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६.१५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

चोरट्यांच्या मारहाणीत सौ. सुनंदा संतोष वामन (वय ३९, रा. वारुळाचा मारुती, नालेगाव) या जखमी झाल्या असून त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. वामन यांची वारुळाचा मारुती परिसरात शेती आहे. ३० एप्रिल रोजी सायंकाळी त्या शेतात काम करत होत्या. त्यावेळी तेथे एका मोटारसायकल वर तीन जण आले. त्यातील एक जण रस्त्यावरच मोटारसायकल घेवून उभा राहिला, तर दोघेजण शेतात वामन यांच्या जवळ गेले.

त्या दोघांनी त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या हल्ल्याने सुनंदा वामन या घाबरुन गेल्या. दोघा चोरट्यांनी त्यांना चाकूचा धाक दाखवत गळ्यातील आणि कानातील दागिने काढून द्यायला सांगितले. वामन यांनी जीवाच्या भीतीने दागिने काढून दिले. त्यानंतर ते चोरटे मोटारसायकल वर बसून पसार झाले.

दरम्यान चोरट्यांच्या मारहाणीत जखमी झालेल्या सुनंदा वामन यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिस ठाण्याचे पो.नि. जगदीश भांबळ, उपनिरीक्षक योगेश चाहेर यांनी घटनास्थळी तसेच रुग्णालयात भेट देत पाहणी केली.












जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# राहुरी पोटनिवडणूक निकाल एकतर्फी, चुरशीचा की धक्कादायक?
# अक्षय कर्डिले – गोविंद मोकाटे यांना विजयाची समसमान संधी





देशातील पश्चिम बंगाल आणि इतर राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा एक्झिट पोल जाहीर झाला असून तो जितका बहुचर्चित ठरला तितकाच तो वादग्रस्त आणि संशयास्पद ठरत आहे. परिणामी ४ मे रोजी मतमोजणी निकाल जाहीर झाल्यावर दूध का दूध और पाणी का पाणी होईल. घोडा मैदान दूर नाही. जी अवस्था निवडणूक झालेल्या राज्यातील विधानसभा निवडणूक निकालाची होईल तीच अवस्था महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची होईल हे कुडमुडे अंदाज त्यापेक्षा वेगळे नाहीत. बारामतीत सहानुभूतीची लाट जरूर आहे, त्यात पक्षीय चुरस नसल्याने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार एकतर्फी विजयी होऊ शकतात. पण ती राजकीय स्थिती राहुरी विधानसभा निवडणुकीची हमखास नाही. जे मतदारसंघाबाहेरील अंदाज व्यक्त करणारे आहेत, ते ढोबळ मानाने भाजपाचे अक्षय कर्डिले विजय होतील असा ठोकताळा व्यक्त करताना दिसतात. मात्र जे राहुरीतील मतदार आहेत, ज्यांनी मतदान केले आहे, ते हा निकाल चुरशीचा असेल असे सांगतात. तर नगर तालुका आणि पाथर्डीतील मतदार धक्कादायक निकाल लागेल, असा अंदाज खाजगीत वर्तवतात. दरम्यान एक एक्झिट पोल तर भाजपचे अक्षय कर्डिले हे ७० ते ८० टक्के मते घेऊन विजयी होतील असे भाकीत वर्तवून मोकळे झाले. त्यांनी हे अनुमान कशाच्या आधारे वर्तविले हा संशोधनाचा विषय ठरतो. अर्थात निकाल अंदाज ज्याचे त्याचे अनुमान असू शकते, निकाल जाहीर होईपर्यंत त्या संदर्भात आक्षेप नोंदवणे उचित ठरणार नाही. परंतु ही वृथा घाई ठरू शकते आणि निकाल अनपेक्षित सुद्धा येऊ शकतो. तसा तो आला तर जिल्ह्याच्या राजकीय पटलावर क्रांतिकारक ठरेल.

## विजयाचे बॅनर्स

राहुरी पोटनिवडणूक निकाल जाहीर होण्यापूर्वी अनेक गावात अक्षय कर्डिले आमदार झाले असे पोस्टर आणि बॅनर लागले आहेत. ही तशी मोठी घाई आहे. यापूर्वी स्वर्गीय कर्डिले साहेब यांच्या समर्थकांनी अशीच गडबड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीबाबत केली होती. पण त्यावेळी कार्यकर्त्यांना सबुरीचा सल्ला दिला होता. अशा घटना जिल्ह्यात यापूर्वी दोन–तीन वेळा झाल्या आहेत. त्यात भाजपचे अक्षय कर्डिले यांचा वाढदिवस ४ मे रोजीच आहे. वाढदिवसाला शुभेच्छा देण्याच्या बहाण्याने त्यांच्या आमदारकीचे भाकीत वर्तवले आहे. आता योगायोग घडून दुग्धशर्करा योग जुळून येणार की वेगळे काही घडणार याचा अंदाज आत्ताच वर्तविणे उचित ठरणार नाही.

## तनपुरेंबाबत सुद्धा प्रश्नचिन्ह

साधारण १९९८ च्या निवडणुकीत प्रसाद तनपुरे आणि चंद्रशेखर कदम यांच्यात चुरशीची निवडणूक झाली होती. त्यावेळी प्रसाद तनपुरे हमखास निवडून येणार असा अंदाज वर्तविला जात होता. पण प्रत्यक्षात निकाल वेगळाच लागला. तनपुरे पराभूत होऊन कदम विजयी झाले. त्यावेळी बॅलेट पेपरवर मतदान होते. राहुरीला मुळा प्रवराची वीज होती. मतमोजणीच्या वेळी वीज गेली. त्यानंतर पुन्हा जेव्हा मतमोजणी झाली, त्यावेळी कदम विजयी झाल्याचे जाहीर करण्यात आले.

## भांगरे–घुलेंचा पराभव

निवडणूक निकालापूर्वी अंदाज वर्तवून विजयाचे भाकीत करणाऱ्यांची कशी फसगत होते हे अकोल्याचे अशोक भांगरे आणि मारुतराव घुले यांच्याबाबतही यापूर्वी घडले आहे. अकोला विधानसभा निवडणुकीत अशोक भांगरे आणि मधुकरराव पिचड यांच्यात चुरस होती. अकराव्या फेरीत भांगरे पुढे असल्याने त्यांच्या समर्थकांनी विजयी मिरवणूक काढून गुलाल उधळला. पण बाराव्या फेरीत काँग्रेसचे मधुकरराव पिचड विजयी झाले. तीच अवस्था शेवगाव–नेवासा मतदारसंघात मारुतराव घुले यांची होऊन तुकाराम गडाख विजयी झाले होते. आता राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे अक्षय कर्डिले की राष्ट्रवादीचे मोकाटे विजयी होणार याबाबत अखेरपर्यंत संभ्रम राहणार असाच राग रंग दिसतो.

## राहुरी शहर निर्णायक

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीचा मतदानोत्तर अंदाज घेता राहुरी शहर आणि राहुरी तालुक्यात कोणाला मताधिक्य मिळते यावर निकालाचा कौल अवलंबून असेल असाच प्राथमिक अंदाज आहे. नगर तालुका आणि राहुरी शहरात गोविंद मोकाटे कदाचित पुढे निघू शकतात. त्यामुळे अंदाज वर्तविणे कठीण होऊ शकते. यापूर्वी स्वतः शिवाजीराव कर्डिले हे नगर तालुका आणि पाथर्डी तालुक्यात मताधिक्य घेऊन विजयी झालेत. पण यावेळी नगर तालुक्याचे मताधिक्य मोकाटे यांच्या बाजूने झुकणारे दिसते असे बोलले जात आहे. तसे झाले तर मात्र निकालाचे पारडे झुकू शकते.राहुरी ग्रामीण भागात भाजपचे अक्षय कर्डिले यांचे पारडे जड आहे. पण ते नगर तालुका आणि राहुरी शहरात तुलनात्मकदृष्ट्या कमकुवत दिसते. प्राजक्त तनपुरे यांचे समर्थक निवडणुकीच्या रिंगणात नसल्याने ते कर्डिले यांना कितपत स्वीकारतील हा कुट प्रश्न उत्तरितच राहतो. परिणामी ही निवडणूक एकतर्फी नव्हे तर चुरशीची असून अक्षय कर्डिले आणि मोकाटे यांना विजयाची समान संधी दिसते. फैसला ४ मे रोजी होईल घोडा मैदान दूर नाही.

– **रामदास ढमाले** (ज्येष्ठ पत्रकार)

# खूप गुंतवणूक असूनही सुरक्षित वाटत नाही, असं कधी वाटलंय?



राजन कुटे

अनेक गुंतवणूकदारांच्या प्रवासात एक टप्पा असा येतो की अधिक गुंतवणूक करणे हेच योग्य वाटू लागते. एखादा नवीन फंड, वेगळी योजना किंवा आधीच्या गुंतवणुकीला पूरक वाटणारा आणखी एक पर्याय. वरवर पाहता हे योग्यच वाटतं. कारण पैसे वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवले की जोखीम कमी होते, असं मानलं जातं. पण हळूहळू या विचारात एक बदल घडत जातो. सुरुवातीला असलेली विविधीकरणाची भावना नकळत साठवणुकीत बदलते, आणि सुरक्षितता वाटणारी गोष्ट हळूहळू गोंधळात रूपांतरित होते.

हे बदल जाणीवपूर्वक घडत नाहीत. ते हळूहळू, आसपासच्या गोष्टींच्या प्रभावातून घडतात. एखाद्या योजनेची अलीकडची कामगिरी, ओळखीच्या व्यक्तीचा सल्ला किंवा आपल्या पोर्टफोलिओमध्ये काहीतरी कमी आहे अशी हलकीशी भावना–प्रत्येक नवीन गुंतवणूक त्या क्षणी योग्य वाटते. पण कालांतराने पोर्टफोलिओची रचना अस्पष्ट होऊ लागते.

खरी अडचण गुंतवणुकींच्या संख्येत नसते, तर स्पष्टतेच्या अभावात असते. जेव्हा खूप गोष्टी एकत्र येतात, तेव्हा नेमकं काय काम करतंय आणि काय नाही, हे समजणं कठीण होतं. निर्णय घेणं अवघड होतं, आढावा घेणं जड होतं आणि प्रत्येक गुंतवणुकीमागचा मूळ हेतू हळूहळू मागे पडतो. प्रत्येक शक्यता कव्हर करण्याच्या प्रयत्नात पोर्टफोलिओचा स्वतःचा स्पष्ट अर्थच हरवतो.

सुयोग्य गुंतवणूक म्हणजे अधिक गोष्टी जोडणे नव्हे, तर प्रत्येक गोष्ट का आहे हे समजून घेणे. प्रत्येक भागाची एक भूमिका असते. काही वाढीसाठी, काही स्थैर्यासाठी आणि काही अनिश्चित काळात मानसिक आधार देण्यासाठी असतात. जेव्हा या भूमिका स्पष्ट असतात, तेव्हा अगदी साधा पोर्टफोलिओही पूर्ण वाटतो.

स्पष्ट कारणाशिवाय गुंतवणूक वाढवत राहणे पोर्टफोलिओला मजबूत करत नाही; उलट नियंत्रणाची केवळ एक भास निर्माण करतो. खरी खात्री ही पर्यायांच्या संख्येत नसते, तर ते एकमेकांशी कसे जोडलेले आहेत याच्या समजण्यात असते.

काही वेळा कमी करणे ही तडजोड नसते, तर सुधारणा असते. थोडं मागे हटून, आधीच असलेल्या गोष्टींकडे पाहणं आणि त्यांना त्यांची भूमिका निभावू देणं हे सतत काहीतरी नवीन शोधण्यापेक्षा अधिक स्थैर्य देतं. प्रत्येक संधीचा पाठलाग करणे आवश्यक नसते, हे ओळखणे महत्त्वाचे असते.

कालांतराने स्पष्ट आणि सुसंगत रचनेत राहणाऱ्या गुंतवणूकदारांना शंका कमी वाटतात. कारण बाजार बदलत नाही म्हणून नाही, तर त्यांची पद्धत स्थिर राहते म्हणून. शेवटी, गुंतवणुकीतील सुरक्षितता ही अधिक पर्यायांमधून येत नाही; ती स्पष्टतेतून येते.

शांत ठेवा, स्पष्ट ठेवा.

– **राजन कुटे**, ॲंफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# इयत्ता बारावीच्या 'बोर्ड परीक्षे'चा नगर जिल्ह्याचा ९०.३२ टक्के निकाल

## पुणे विभागात नगर जिल्ह्याचा टक्का घसरला; ५ हजार ६९९ विद्यार्थी झाले नापास

नगर – राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी – मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या इयत्ता १२वी च्या परीक्षेचा निकाल २ मे दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर केला आहे. या निकालात नगर जिल्ह्याचा निकाल ९०.३२ टक्के लागला असून पुणे विभागात नगर जिल्ह्याचा निकाल थेट तिसर्या क्रमांकावर घसरला आहे.

तर पुणे जिल्ह्याने प्रथम क्रमांक (९३.३२ टक्के) मिळविला असून सोलापूर जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर (९१.२५ टक्के) आहे. नगर जिल्ह्यात ५८ हजार ८९५ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेला बसले होते. त्या पैकी ५३ हजार १९६ विद्यार्थी पास झाले आहेत. तर ५ हजार ६९९ विद्यार्थी नापास झाले आहे. पास होणाऱ्यांमध्ये मुलींचे प्रमाण ९४.५५ टक्के तर मुलांचे प्रमाण ८६.७४ टक्के एवढे आहे. जिल्ह्याचा विज्ञान शाखेचा निकाल ९६.५५, कला शाखेचा ७५.५९, वाणिज्य शाखेचा ८५.२६ टक्के लागला आहे. गतवर्षीच्या तुलनेत विज्ञान शाखेच्या निकालात वाढ झाली आहे. मात्र कला व वाणिज्य शाखेचा निकाल घसरला आहे.

### जिल्ह्यात जामखेड तालुका प्रथम

१२ वी च्या परीक्षेच्या निकालात या वर्षी जामखेड तालुक्याचा प्रथम क्रमांक आला आहे. जामखेडचा निकाल ९७.२९ टक्के लागला आहे. त्यापाठोपाठ संगमनेर –९५.०१, शेवगाव – ८३.९२, पारनेर – ९१.९४, नगर – ८९.८६, नेवासा – ९०.८६, कर्जत – ८९.८२, कोपरगाव – ९०.९६, पाथर्डी – ८६.२५, राहता – ९१.५९, राहुरी – ८८.७३, श्रीगोंदा – ९४.८९, अकोले – ८६.७८, श्रीरामपूर –८६.०८ टक्के असा निकाल लागला आहे.

# केडगाव परिसरात घर फोडून चोरी

नगर – केडगाव परिसरातील सुतारगल्ली येथे घरफोडीची घटना घडली असून, चोरट्याने रोख रकमेसह मोबाईल आणि केटरिंगचे साहित्य चोरून नेले आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी एका आरोपीला निष्पन्न केले आहे. या संदर्भात संतोष एकनाथ बनकर (वय ४६, रा. सुतार गल्ली, संभाजी चौक, केडगाव) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बनकर यांचा मसाल्याचा व्यवसाय असून ते केडगावमधील सुतारगल्लीत राहतात. त्यांच्या घरात शिरून आरोपी नवनाथ मारुती देवकर याने चोरी केली. चोरट्याने घरातून १० हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि १० हजार रुपयांची रोख रक्कम चोरली. तसेच व्यवसायाचे १००० रुपये किमतीचे केटरिंगचे साहित्यही लंपास केले. हा प्रकार २२ एप्रिल आणि २९ एप्रिलच्या मध्यरात्री घडला. एकूण २१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे समोर आले आहे. बनकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी नवनाथ देवकर याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून पुढील तपास सुरु आहे.

# छत्रपती संभाजीनगर रोडवर ढंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

नगर – रस्ता ओलांडताना भरधाव ढंपरने दिलेल्या जोराच्या धडकेत एका वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर ते छत्रपती संभाजीनगर रोडवर ३० एप्रिल रोजी सकाळी ९.४५ च्या सुमारास घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात ढंपरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेंडी येथील रहिवासी समद जैनुद्दीन पठाण यांच्या मातोश्री शरीफा जैनुद्दीन पठाण (वय ६२) या तपोवन रोडवरील आपल्या गाळ्याकडे जात होत्या. हॉटेल इंद्रायणीसमोर रिक्षामधून उतरून त्या झेब्रा क्रॉसिंगवरून रस्ता ओलांडत असताना, तपोवन रोडकडून आलेल्या पांढऱ्या रंगाच्या भरधाव ढंपरने (क्र. एमएच १६ एवाय ९१२०) त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की ढंपरचे पुढचे चाक शरीफा यांच्या अंगावरून गेले, ज्यामध्ये त्यांच्या डोक्याला व कमरेला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर जखमीला मदत करण्याऐवजी चालक भिवा बाबुराव तरटे (रा. नारायणडोह, ता.नगर) हा ढंपर घटनास्थळी सोडून पसार झाला. जखमी शरीफा यांना तातडीने सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी मुलगा समद पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी आरोपी चालक भिवा तरटे याच्यावर निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याबद्दल गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# जिल्ह्यात पाणीटंचाई व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज : टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरळीत

नगर – जिल्ह्यात वाढते तापमान व संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन करत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखेमार्फत टंचाईग्रस्त भागांचे सूक्ष्म देखरेख करण्यात येत असून, कोणत्याही नागरिकाला पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी यंत्रणा दक्षतेने कार्यरत आहे.

२९ एप्रिल २०२६ रोजीच्या अहवालानुसार जिल्ह्यातील एकूण ३४ गावे व १६२ वाड्या–वस्त्यांमध्ये पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली असून सुमारे ६४ हजार ५८६ नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या भागांसाठी एकूण ३० टँकर (४ शासकीय व २६ खासगी) कार्यरत असून संगमनेर, पारनेर व नगर या तालुक्यांमध्ये टंचाईचे प्रमाण अधिक असल्याने तेथे अनुक्रमे १०, १३ व ६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

टँकरच्या खेपांबाबतही समाधानकारक प्रगती नोंदविण्यात आली आहे. मंजूर ९०.९२ खेपांपैकी ८८ खेपा पूर्ण करण्यात आल्या असून हे प्रमाण सुमारे ९६.७९ टक्के आहे. यामुळे टंचाईग्रस्त भागांमध्ये पाणी वेळेत पोहोचत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पाणीटंचाईवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्ह्यातील १२ विहिरी व बोअरवेलचे अधिग्रहण करण्यात आले असून त्यापैकी ३ जलस्त्रोत थेट गावांसाठी तर ९ टँकर भरण्यासाठी वापरण्यात येत आहेत. आवश्यकतेनुसार अतिरिक्त खाजगी जलस्त्रोत अधिग्रहित करण्याचे अधिकार संबंधित तहसीलदारांना देण्यात आले आहेत. संभाव्य टंचाईग्रस्त गावांसाठी आगाऊ कृती आराखडा तयार करण्यात आला असून टँकर प्रस्तावांना तात्काळ मंजुरी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ओआरएस व आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना गळती किंवा पाण्याची चोरी होऊ नये यासाठी विशेष भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले असून, पाणीपुरवठा व्यवस्थापनासाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचे स्पष्ट केले आहे.

# महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र मोटारसायकल वरील दोघांनी लांबवले

नगर – शहरातील गजबजलेल्या भागात चोरट्यांचा सुळसुळाट वाढला असून, पहाटेच्या सुमारास दर्शनासाठी जाणाऱ्या एका ७१ वर्षीय महिलेच्या गळ्यातील ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनीगंठण मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी बळजबरीने ओरबाडून नेले. शहरातील जीपीओ चौकाजवळील रॉयल कॅन्टीन परिसरात १ मे रोजी पहाटे ५.३९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

याबाबत मंदाकिनी रमेशचंद्र सुपेकर (रा. गंज बाजार, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी सुपेकर या नेहमीप्रमाणे पहाटे आपल्या मैत्रिणीसोबत देवदर्शनासाठी जात होत्या. जीपीओ चौकाजवळील महादेव मंदिराकडे जात असताना मागून आलेल्या काळ्या रंगाच्या दुचाकीवरील दोघांनी हा प्रकार केला. दुचाकीवर मागे बसलेल्या ३० ते ३५ वयोगटातील सडपातळ बांध्याच्या इसमाने, ज्याने तोंडाला रुमाल बांधला होता, त्याने सुपेकर यांच्या गळ्यातील दीड तोळे वजनाचे दागिने तोडले आणि वेगाने पसार झाला. फिर्यादींनी आरडाओरड केली, परंतु तोपर्यंत आरोपी पसार झाले होते.

याप्रकरणी सुपेकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून चोरट्यांचा शोध घेतला जात आहे. वाढत्या चोऱ्यांच्या घटनांमुळे नागरिकांनी पहाटे घराबाहेर पडताना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. शहरातील मुख्य चौकात पोलिसांची गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप पीक विम्याचे ११८.६३ कोटी मंजूर

लोणी – अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत २०२५ च्या खरीप हंगामातील पिकांसाठी सुमारे ११८.६३ कोटी रुपये मंजूर झाले असल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील सुमारे २ लाख २३ हजार शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२५ मध्ये पीक विमा योजनेत सहभाग नोंदविला होता. त्यानुसार २.३९ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचा विमा उतरविण्यात आला होता. पीक विमा योजनेत अधिसूचित केलेल्या पिकांचे दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, कीड व रोग इत्यादी कारणांनी नुकसान झाल्यास, पीक कापणी प्रयोगावर आधारित येणाऱ्या उत्पन्नानुसार नुकसान भरपाई देण्याची तरतूद या योजनेमध्ये आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत ११८.६३ कोटी रुपये मंजूर झाले असून, नगर तालुका : ५ कोटी ३ लाख, अकोले : १ कोटी १७ लाख, जामखेड : १७ कोटी ७१ लाख, कर्जत : ८९ हजार, कोपरगाव : ९ कोटी ६६ लाख, नेवासा : २२ कोटी ६८ लाख, पारनेर : २१ कोटी ७२ लाख, पाथर्डी : १ कोटी ४० लाख, राहाता : १३ कोटी ९२ लाख, राहुरी : ६ कोटी २४ लाख, शेवगाव : १ कोटी ७ लाख, आणि श्रीरामपूर : १७ कोटी ९६ लाख रुपये इतकी नुकसान भरपाई मंजूर झाली असल्याची माहिती मंत्री विखे पाटील यांनी दिली.

कृषी, महसूल व ग्रामविकास विभागाने समन्वयाने पीक कापणी प्रयोगाचे काटेकोर नियोजन व अंमलबजावणी केल्यामुळे मागील वर्षीच्या खरीप हंगामातील पीक नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळाली आहे. काही तालुक्यांतील भरपाईबाबतची परिगणना अद्याप प्रगतीपथावर असून, कापूस व कांदा पिकांच्या नुकसान भरपाईबाबतही प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

# लिलाबाई गांधी यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर – करपेमळा, सारसनगर येथील रहिवासी लिलाबाई गांधी (वय ७९, शहरटाकळीवाला) यांचे २ मे रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, एक मुलगा, चार मुली, सुना, तीन जावई, नातवंडे असा परिवार आहे. रसिकलाल गांधी यांचे ते पत्नी होत.

# प्रशांत गांधी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बुरुडगाव रोड, आदर्श अपार्टमेंट येथील रहिवासी प्रशांत प्रेमसुख गांधी यांचे (वय ५९) ३० एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १ मे रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ, भावजया, एक बहीण, मेव्हुणे असा परिवार आहे. प्रमोद गांधी यांचे मोठे बंधू, स्व.रतिकांत व सुभाष कनकमल गांधी यांचे पुतणे तर परेश गांधी यांचे ते वडील होत.

# किरण घोटेकर यांचे हृदयविकाराने निधन



नगर – जनतानगर, संगमनेर येथील रहिवासी किरण पुंजाहरी घोटेकर (वय ४६) यांचे १ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर संगमनेर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले असा परिवार आहे.

# व्हीआरडीईच्या मुख्य जलवाहिनीवर ६ ठिकाणी अनधिकृत नळ जोडण्या, गुन्हा दाखल

नगर – नगर दौंड रोड वरील वाहन संशोधन आणि विकास संस्थेच्या (व्हीआरडीई) मुख्य पिण्याच्या पाण्याच्या वाहिनीवर अज्ञात इसमांनी सहा विविध ठिकाणी अनधिकृत नळ जोडण्या घेऊन सरकारी मालमत्तेचे नुकसान केले आहे. याप्रकरणी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी विठ्ठल मुरलीधर वायकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे संस्थेचा पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने संचालकांच्या आदेशानुसार लष्करी अभियंता सेवेच्या कर्मचाऱ्यांसह १४ किलोमीटर लांबीच्या जलवाहिनीची तपासणी करण्यात आली. यावेळी नगर–दौंड रस्त्यावरील सॉलिटेअर इमारत परिसरातील नाल्यात तीन ठिकाणी, पांजरपोळ जवळ दोन ठिकाणी आणि कायनेटिक कंपनीच्या पुढे एका ठिकाणी अशा एकूण सहा ठिकाणी चोरून नळ जोडण्या घेतल्याचे उघड झाले. अज्ञात आरोपींनी स्वतःच्या फायद्यासाठी ही सरकारी जलवाहिनी फोडून पाण्याचा गैरवापर केला आहे.

या कृत्यामागे कोणा समाज विघातक शक्तींचा हात आहे का, तसेच लष्करी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे का, यादृष्टीने सखोल चौकशी करण्याची मागणी फिर्यादीत करण्यात आली आहे.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# नदी पात्रात बुडून १२ वर्षीय बालकाचा मृत्यू

संगमनेर – प्रवरा नदी पात्रात बुडून १२ वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना संगमनेर खुर्द येथे १ मे रोजी घडली. कृष्णा चंद्रशेखर चिंता (रा. संगमनेर खुर्द) असे मयत बालकाचे नाव आहे.



कृष्णा चिंता (मयत)

त्याच्या पश्चात आई, वडील, १ बहिण असा परिवार आहे. कृष्णा याच्यावर संगमनेर येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी संगमनेर शहर पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# बस स्थानकात वाहतूक नियंत्रण कक्षासमोर कर्मचाऱ्याला हातोडीने मारहाण

नगर – मुलीला त्रास देणाऱ्या तरुणाला जाब विचारल्याचा राग मनात धरून, पुणे बस स्थानकावरील वाहतूक नियंत्रण कक्षात घुसून एका कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात कल्याण मच्छिंद्र भवर आणि त्याच्या दोन अनोळखी साथीदारांनी किशोर पांडुरंग घोडके यांच्यावर हातोडीने वार करून त्यांना गंभीर जखमी केले आहे.

जखमी कर्मचाऱ्याची मुलगी शहरात शिक्षण घेत आहे. काही दिवसांपूर्वी गावातीलच तरुण कल्याण भवर याने मुलीला गाठून बोलण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकाराबाबत वडिलांनी तरुणाला जाब विचारला असता त्यांच्यात बाचाबाची झाली होती. याच वादाचा वचपा काढण्यासाठी आरोपीने आपल्या साथीदारांसह बस स्थानक गाठले.

सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास कर्तव्यावर असलेल्या घोडके यांना कक्षाबाहेर बोलावून आरोपींनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तू खूप माजला आहेस का? असे म्हणत तिघांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी तुडवले. याच वेळी कल्याण भवर याने हातातील हातोडीने घोडके यांच्या डाव्या हातावर प्रहार केला, ज्यामध्ये त्यांच्या बोटांना गंभीर दुखापत झाली.

तेथे उपस्थित असलेल्या कृष्णा शेळके, विनायक घिगे व इतर सहकाऱ्यांनी मध्यस्थी करत घोडके यांची सुटका केली. पळून जाताना आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. जखमी कर्मचाऱ्याने जिल्हा रुग्णालयात उपचार घेतले असून, कोतवाली पोलीस ठाण्यात कल्याण भवर व इतर दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.






माउली अर्थ्रायटिस आणि रुमॅटोलॉजी क्लिनिक' तर्फे नुकतेच वॉकथॉन मध्ये सहभागी डॉ. विद्या अभिजित सांगळे - बांगर, रेडिओलॉजिस्ट डॉ. अभिजित सांगळे व इतर .

# संधिवात रुग्णांसाठी माऊली क्लिनिकचे कार्य कौतुकास्पद

## महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन

नगर - येथील 'माउली अर्थ्रायटिस आणि रुमॅटोलॉजी क्लिनिक' तर्फे नुकतेच वॉकथॉन आणि मोफत तपासणी शिबिर झाले. शेकडो रुग्णांनी, नागरिकांनी याचा लाभ घेतला. हे कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार महापौर ज्योतीताई गाडे यांनी काढले.

महापौर गाडे यांच्या प्रमुख उपस्थितीतीत कार्यक्रमास प्रारंभ झाला. माऊली क्लिनिकच्या संचालिका डॉ. विद्या अभिजित सांगळे - बांगर यांनी उपक्रमाचा उद्देश सांगितला. जनतेमध्ये संधिवाताबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि आजाराचे वेळेवर निदान व उपचारांना प्रोत्साहन देणे, यासाठी हा उपक्रम घेतला असल्याचे त्या म्हणाल्या.

या वेळी संधिवाताची लक्षणे, आधुनिक उपचार पद्धती आणि ऑटोइम्यून आजारांच्या व्यवस्थापनात तज्ज्ञ डॉक्टरांच्या भूमिकेवर मार्गदर्शन करण्यात आले. अनेक नागरिकांनी आरोग्य तपासणी करून घेतली आणि तज्ज्ञांकडून वैद्यकीय सल्ला मिळवला.

जनजागृतीसाठी माहिती पत्रकांचे वाटप करण्यात आले. स्थानिक राजकीय नेते, शेतकरी आणि सर्व स्तरांतील नागरिकांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. सार्वजनिक आरोग्याप्रती असलेल्या आपल्या बांधिलकीतून माउली अर्थ्रायटिस आणि रुमॅटोलॉजी क्लिनिक अशा सामाजिक उपक्रमांत नेहमीच अग्रेसर असते, असे कौतुक केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अक्षरधनमध्ये पुन्हा संतसाहित्याचा नंदादीप






सुजाण वाचकांनो, सप्रेम नमस्कार. कोरोना काळात शुभारंभ झालेली अक्षरधन नामक प्रेरणादायी लेखमाला आता 'नवा मराठा' वाचकांसाठी नेहमीच्या औत्सुक्याची बनली आहे.

मागील ६ महिन्यात चपराक प्रकाशन निर्मित डॉ. रामचंद्र देखणे लिखीत समाज मनाला सुखावणारी 'चैतन्य पालवी' फुलवली. यातून सात्त्विक, संत व अध्यात्मिक विचारांचा ताटवा ठेवला गेला.

याच संत साहित्याला पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न असून त्या दृष्टीने संत विचारांचा नंदादीप नव्याने तुमच्या पुढे ठेवून चांगल्या, विधायक व प्रेरणादायी प्रकाशनाने समाजात आशेचे किरण उजळवण्याचा मानस आहे.

जवळपास प्रत्येक वर्गातल्या माणसांना मानसिक, आर्थिक, शारिरीक ताणतणावांना सामोरे जावे लागत आहे. नैसर्गिक व जागतिक परिस्थितीही शांत, सामान्य राहिलेली नाही.

मानवीय शक्ती बळकट ठेवणे, मनामनाला बळ देणे, दिलासा देण्या हेतू आता हा नाविन्याने भरलेला नंदादीप आपणापुढे ठेवत आहोत.

वृत्तपत्रीय जागेत विधायक विचारांचाही मागोवा, मनन-चिंतन वाचकांना घेता यावा म्हणून संत साहित्यातल्या व्यासंगी व अधिकारी साहित्यिकाचे अर्थातच (स्व.) डॉ. मधुकर अष्टीकर यांनी केलेलं सहज, सुलभ, रसाळ निरुपण रोजच्या सदरात आपणास मिळेल. ते आपणा सर्वांना दैनंदिन जगण्या आचरणात प्रेरक व प्रेरणादायी ठरावी अशी अपेक्षा.

चैतन्य पालवी फुलल्यानंतर आता हा नंदादीप चिंतनीय, मननीय विचारांना प्रकाश देईल याचा विश्वास वाटतो. आपल्या प्रतिक्रिया व प्रतिसादाच्या पाठबळावर. **- किशोर गांधी**

# जमाबंदी आयुक्त कार्यालयावर ४ मे रोजी 'पेरू वाटप आंदोलन'



नगर - राज्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय ठरलेल्या शिव पाणंद शेतरस्त्यांच्या समस्यांनी आता तीव्र रूप धारण केले असून, अद्यावत गाव नकाशांचा अभाव आणि शेतरस्त्यांचे सीमांकन प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना दळणवळणात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सविस्तर निवेदन देत मागण्या मांडल्या आहेत. प्रमुख मागण्या प्रत्येक गावातील सर्व शेतरस्त्यांचे तातडीने सीमांकन करून अधिकृत नोंद करावी, रस्त्यांना सांकेतिक क्रमांक देऊन डिजिटल नकाशांमध्ये समाविष्ट करावे, गाव नकाशांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करून अचूक मोजमाप (लांबी, रुंदी, अक्षांश-रेखांश) नोंदवावे, रस्त्यांच्या हद्दीवर कायमस्वरूपी सीमा चिन्हे बसवावीत, अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह

२ ऑक्टोबरच्या पार्श्वभूमीवर जाहीर करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान अंतर्गत घेतलेल्या निर्णयांची अद्याप अंमलबजावणी झालेली नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तसेच अनेक प्रकरणे तालुका भूमि अभिलेख कार्यालयात प्रलंबित ठेवल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रकरणे निकाली काढण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ व यंत्रसामग्री उपलब्ध करावी कामचुकार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून निलंबन व गुन्हे दाखल करावेत, प्रामाणिक अधिकाऱ्यांना पदोन्नती देऊन प्रोत्साहन द्यावे मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास, ४ मे रोजी सकाळी ११ वाजता पुण्यात जमाबंदी आयुक्त कार्यालयावर 'पेरू वाटप आंदोलन' छेडण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

या आंदोलनाबाबतचा इशारा चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य प्रसिद्धीप्रमुख रविंद्र खुडे यांनी जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांना दिला आहे. या निवेदनाच्या प्रती राज्यातील प्रमुख नेत्यांसह पोलिस प्रशासनालाही पाठवण्यात आल्या आहेत.



अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर द्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना नोकरीसाठी सज्ज करण्यासाठी विशेष 'इंटरव्ह्यू प्रिपरेशन' सत्राचे आयोजन डॉ. योगेश बाफना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते यामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

# 'अरिहंत कॉलेज' येथे 'इंटरव्ह्यू स्किल्स' कार्यशाळेद्वारे विद्यार्थ्यांची करिअरकडे वाटचाल

नगर - फार्मास्युटिकल क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेच्या युगात, केवळ तांत्रिक ज्ञान असून चालत नाही, तर मुलाखतीमध्ये स्वतःला प्रभावीपणे सादर करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. हे ओळखून, अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर द्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना नोकरीसाठी सज्ज करण्यासाठी विशेष 'इंटरव्ह्यू प्रिपरेशन' सत्राचे आयोजन डॉ. योगेश बाफना यांचा मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सत्राचे प्रमुख GTT foundation, Pune चे ट्रेनर प्रा.अंकुश भालेराव यांनी या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना मुलाखतीतील आव्हानांना कसे सामोरे जावे, याचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळे मध्ये विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे मार्गदर्शन केले गेले.

मुलाखतीसाठी यशाची सूत्रे - कंपनीचा सखोल अभ्यास (Research) : ज्या कंपनीत मुलाखतीसाठी जात आहात, त्या कंपनीच्या उत्पादनांची, मार्केटमधील स्थानाची आणि ध्येयधोरणांची माहिती आधीच मिळवा.

तांत्रिक ज्ञानावर प्रभुत्व (Technical Knowledge) : फार्मसी विद्यार्थ्यांसाठी फार्मास्युटिक्स, फार्माकोलॉजी आणि ड्रग रेग्युलेशन यांसारख्या विषयांचे मूलभूत ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे. मुलाखतीपूर्वी आपले शैक्षणिक कन्सेप्ट्स पुन्हा एकदा उजळणी करून घ्या.

प्रभावी संवाद कौशल्य (Communication Skills) : मुलाखतीदरम्यान आत्मविश्वासपूर्ण आणि स्पष्ट भाषेत उत्तरे द्या. तुमची भाषा साधी पण मुद्देसूद असावी.

देहबोली (Body Language) : मुलाखतीची खोली 'नॉक' करून आत जाण्यापासून ते बाहेर येण्यापर्यंत तुमची देहबोली सकारात्मक ठेवा. हातांची हालचाल, डोळ्यांत पाहून बोलणे (Eye contact) आणि चेहऱ्यावरचे हास्य यांचा सकारात्मक प्रभाव पडतो.

वेळ पाळणे (Punctuality) : मुलाखतीच्या ठिकाणी वेळेच्या १०-१५ मिनिटे आधी पोहोचा. वेळेचे नियोजन तुमच्या शिस्तीचे प्रतीक असते.

तुमच्या स्वतःबद्दल सांगा किंवा आम्ही तुमची निवड का करावी? अशा सामान्य पण महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे आधीच तयार ठेवा.

प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी सांगितले की, आमच्या विद्यार्थ्यांच्या भविष्याला योग्य दिशा मिळावी, हाच या उपक्रमाचा उद्देश आहे. केवळ पदवी मिळवणे हे ध्येय नसून, एक उत्तम 'फार्मास्युटिकल प्रोफेशनल' घडवणे हे आमचे ध्येय आहे. सर्व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन स्वतःला अधिक सक्षम करावे.

विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा उपयोग करून आगामी काळात येणाऱ्या कॅम्पस प्लेसमेंट्समध्ये उत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा उपप्राचार्य वर्षाराणी आव्हाड यांनी व्यक्त केली.

# अहिल्यानगर अखिल विश्व गायत्री परिवाराच्या वतीने २४ कुंडीय महायज्ञ

## हम बदलेंगे-युग बदलेगा' हे ब्रीदवाक्य घेऊन व्यक्ती सुधारणा ते राष्ट्र निर्माणाचे गायत्री परिवाराचे कार्य : काशीनाथ मोडे यांचे प्रतिपादन





नगर - गायत्री परिवाराची स्थापना पं.श्रीराम शर्मा आचार्य यांनी १९५८ मध्ये केली. हरिद्वार येथील गायत्री परिवार हे एक आध्यात्मिक व सामाजिक संघटन आहे. भारतीय संस्कृती व सनातन धर्म च्या माध्यमातून गुरुदेवांनी अखंड ज्योत १९२६ रोजी स्थापन केली. २०२६ शंभरवर्ष पूर्णत्वाकडे अखंड साधना अखंड यज्ञ चालू आहे. भारतीय ऋषी परंपरा संस्कृती टिकवण्यासाठी व आजच्या युगामध्ये प्रत्येक मानव सद्बुद्धीच्या मार्गावरती चालण्यासाठी अखंड गायत्री साधना व गायत्री महायज्ञ परंपरा चालू आहे. विज्ञान श्रेष्ठ आहे व अध्यात्म अजूनही श्रेष्ठ आहे दोघांच्या एकरूपतीसाठी वातावरण व पर्यावरण शुद्धी करण करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी समजून सर्वांना निसर्गाच्या मदतीसाठी वसुदैव कुटुम्बकम ची भावना ठेवून घरोघरी गायत्री महायज्ञ करण्याचे नियोजन अहिल्यानगर शहरांमध्ये सुरू केलेले आहे.

हम बदलेंगे-युग बदलेगा हे ब्रीदवाक्य घेऊन व्यक्ती सुधारणा ते राष्ट्र निर्माणाचे कार्य गायत्री परिवार सातत्याने करीत आहे. लोककल्याणाकरिता गायत्री महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. गायत्री मंत्राची सामूहिक साधना, वैज्ञानिक आधारावर मंत्रशक्तीचा प्रचार, १६ संस्कारांचे पुनरुज्जीवन, पर्यावरणपूरक यज्ञ, व्यसनमुक्ती, स्त्रियांना गायत्री मंत्राचा अधिकार, कोट्यवधी वृक्षांची लागवड, गंगा स्वच्छता, जलसंरक्षण असे सामाजिक हित जोपासणारे गायत्री परिवाराचे कार्य आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर अखिल विश्व गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे यांनी केले आहे.

अरणगाव रोडवरील, आझादनगर येथे अखिल विश्व गायत्री परिवाराच्या वतीने २४ कुंडीय महायज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त प्रा.माणिक विधाते, कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजीराव गायकवाड, अहिल्यानगर अखिल विश्व गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे, विश्व हिंदू परिषदेचे माजी जिल्हा मंत्री गजेंद्र सोनवणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर, विश्व हिंदू परिषद मंदिर, अर्चक पुरोहित आयमाचे जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, सहप्रमुख हरिभाऊ डोळसे, अरुण खिची, वीरेंद्र शिंदे, चंद्रकांत पुंड, देविदास साळुंखे आदी उपस्थित होते.

गायत्री परिवार आयोजित महायज्ञासाठी अरणगाव, बुरुडगाव, केडगाव, भिंगार, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर शहर परिसरातील भाविक उपस्थित होते.

# छावनी परिषद शाळेच्या वेदांत व साईची एनएमएमएस जिल्हा गुणवत्ता यादीत निवड





भिंगार - राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेची जिल्हा गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली असून छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेने यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत आपली यशस्वी परंपरा कायम राखली आहे.

शाळेतील वेदांत संदीप साबळे याने अनुसूचित जाती प्रवर्गातून १२३ गुण मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत १२ वे स्थान पटकावले, तर साई प्रशांत कोष्टी याने विशेष मागास प्रवर्गातून १०१ गुण मिळवत ११ वे स्थान मिळवून शाळेचा गौरव वाढवला आहे.

गेल्या काही वर्षांपासून शाळेत राबविण्यात येणाऱ्या स्कॉलरशिप, एनएमएमएस, मंथन, लक्षवेद व प्रज्ञाशोध या विविध स्पर्धा परीक्षांच्या सातत्यपूर्ण सराव वर्गांचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ होत आहे. याच नियोजनबद्ध तयारीमुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले असून शाळा शैक्षणिक क्षेत्रात दिवसेंदिवस नेत्रदीपक प्रगती करत आहे.

या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले असून स्नेहल लवांडे, सोन्याबापू लबडे आणि महेश मोहिते यांनी विद्यार्थ्यांना परिश्रमपूर्वक मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे छावनी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, मनोनित सदस्य वसंत राठोड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जयदेव हेंद्रे, तसेच मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



नगरसेवक सुरेश बनसोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

# नगरसेवक सुरेश बनसोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ

नगर - शहरातील मार्केट यार्ड आनंदधाम मार्ग परिसर येथे नगरसेवक सुरेश बनसोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ पार पडला. या कार्यालयाचे उद्घाटन डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रभागातील नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्यासाठी तसेच लोकांशी थेट संवाद साधण्यासाठी हे संपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

नवीन कार्यालयाच्या माध्यमातून प्रभाग १३ मधील नागरिकांना प्रशासनाशी थेट संपर्क साधणे अधिक सुलभ होणार असून स्थानिक पातळीवरील प्रश्न सोडवण्याला नवी दिशा मिळणार आहे. तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी हे केंद्र प्रभावीपणे कार्यरत राहणार असल्याचे नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी सांगितले.

# यशस्वी होण्यासाठी योग्य पर्याय निवडा : प्रा.एकनाथ होले



श्री स्वामी आण्णा हजारे शिक्षण संस्थेच्या नेप्ती विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## नेप्ती विद्यालयात मोफत दहावीनंतरच्या करिअर मार्गदर्शनाला प्रतिसाद

नगर - नगर तालुक्यातील नेप्ती येथील श्री स्वामी आण्णा हजारे शिक्षण संस्थेच्या नेप्ती विद्यालयात मोफत दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दहावीनंतर पुढे काय? या विषयावर करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बोर्ड परीक्षा होऊन जवळपास एक महिना उलटला असून निकाल लवकरच जाहीर होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये पुढील वाटचालीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

कार्यक्रमात प्रा. एकनाथ होले यांनी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक पर्यायांची सविस्तर माहिती देत योग्य निर्णय घेण्याचे महत्त्व पटवून दिले. दहावीनंतर अकरावी सायन्स, कॉमर्स, आर्टस्, आयटीआय, डिप्लोमा तसेच विविध कॉम्प्युटर कोर्सेस असे अनेक पर्याय उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आवडीनिवडी, क्षमता आणि भविष्यातील ध्येय लक्षात घेऊन शाखा निवडावी. यशस्वी होण्यासाठी योग्य पर्याय निवडा असे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, सायन्स शाखा निवडल्यास इंजिनिअर, डॉक्टर, संशोधक आणि तज्ज्ञ शास्त्रज्ञ होण्याच्या संधी उपलब्ध होतात, तर कॉमर्स शाखेतून सीए, सीएस यांसारख्या व्यावसायिक क्षेत्रात करिअर घडवता येते, असेही त्यांनी नमूद केले. तसेच कला शाखेतून शिक्षक, प्राध्यापक, वकील तसेच विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत जाण्याचे मार्ग खुले होतात. योग्य दिशा निवडल्यासच यश निश्चित आहे. दहावी हा आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून या टप्प्यानंतर घेतलेला निर्णय पुढील करिअर घडवतो. त्यामुळे केवळ इतरांच्या सांगण्यावरून नव्हे, तर स्वतःच्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार निर्णय घ्या. प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध आहे. सायन्स, कॉमर्स किंवा आर्टस् कोणतीही शाखा कमी किंवा जास्त नाही. प्रत्येक शाखेत प्रगती करण्यासाठी मेहनत, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक असते. आजच्या काळात कौशल्याला जास्त महत्त्व असून, विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करावीत, असेही त्यांनी नमूद केले.

स्पर्धा परीक्षा जसे की एमपीएससी, यूपीएससी, स्टाफ सिलेक्शन यांसारख्या परीक्षांद्वारे प्रशासनात जाण्याच्या संधी उपलब्ध आहेत. विशेषतः कला शाखेतील विद्यार्थ्यांना या क्षेत्रात उज्ज्वल भविष्य घडवण्याची संधी आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी प्राध्यापक गोविंद कदम व अन्य मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक महेश जाधव, रामदास फुले, प्राध्यापक एकनाथ होले, प्रा. गोविंद कदम, प्रा. गोरक्ष कांडेकर, नानासाहेब घोडके, राजेंद्र झावरे, बाबासाहेब भोर, गोरक्ष कोतकर, शिवाजी जाधव, सविता कोरडे, श्रद्धा भांड, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता दहावीचे विद्यार्थी उपस्थित राहून या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींबाबत स्पष्ट दिशा मिळाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.



अहिल्यानगर महिला प्रीमियर लीग आयोजित क्रिकेट स्पर्धेतील खेळाडू. (छायाचित्र : लहू दळवी)

# अहिल्यानगर महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा थरार, राज्यातील क्रिकेटपटूंच्या खेळाने रंगली मैदानावरील लढत

### शिवराज वॉरियर्स विरुद्ध जी.एन.एस. नाईट रायडर्स यांच्यात रंगणार अंतिम सामना

नगर – वाकोडी येथील साईदीप क्रिकेट मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या अहिल्यानगर महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेने क्रीडारसिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. राज्यातील नामांकित महिला क्रिकेटपटूंच्या दमदार सहभागामुळे या स्पर्धेला राज्यस्तरीय स्वरूप प्राप्त झाले आहे. मैदानावर चौकार–षटकारांचा वर्षाव, अचूक गोलंदाजी, चपळ क्षेत्ररक्षण आणि उत्कंठावर्धक सामने यामुळे क्रिकेटप्रेमींना रोमांचकारी अनुभव मिळत आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्र क्रिकेट संघाची उपकर्णधार मुक्ता नगरे, आयपीएल महिला खेळाडू पूनम खेमनर, महाराष्ट्र संघातील आरती केदार, किरण नवगिरे, अंबिका वाताडे तसेच भारतीय महिला क्रिकेट क्षेत्रातील प्रसिद्ध खेळाडू किरण नवगिरे यांनी सहभाग नोंदवत आपल्या उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडविले. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेची प्रतिष्ठा उंचावली असून स्थानिक महिला खेळाडूंमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

मुंबई, पुणे, बीडसह राज्यातील विविध भागांतून महिला क्रिकेटपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना एकत्र येत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली. अनेक युवा महिला खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील आपल्या गुणवत्तेने उपस्थितांची मने जिंकली.

अहिल्यानगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने आणि एस. के. क्रिकेट अॅकॅडमीच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण स्पर्धेला क्रिकेटपटू संदीप पडोळे यांचे मार्गदर्शन लाभत असून व्यवस्थापनाने उत्कृष्ट नियोजन केले आहे.

स्पर्धेचा अंतिम सामना शिवराज वॉरियर्स विरुद्ध जी.एन.एस. नाईट रायडर्स यांच्यामध्ये रंगणार असून या अंतिम लढतीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दोन्ही संघांनी उपांत्य फेरीत दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला असून विजेतेपदासाठी चुरशीची लढत होणार असल्याची चर्चा रंगली आहे.

# परमार्थात अहंकार हा मोठा अडसर

### डॉ.सी.बी कुलकर्णी यांचे प्रतिपादन, सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे ज्ञान विज्ञान पुरस्कार प्रदान



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे ज्ञानविज्ञान पुरस्कार डॉ.सी.बी कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला (छाया : हेमंत ढाकेफळकर)

नगर – मनुष्य जन्म हा दुर्लभ आहे. म्हणूनच या जन्मात आपला उद्धार करून घेतला पाहिजे. माझ्या या नर जन्माचे प्रयोजन काय याचा विवेक बुद्धीने प्रत्येकाने विचार करावा. बाबा बेलसरे म्हणतात, त्याप्रमाणे सतत 'मी' केले मीच कर्ता हा भाव ठेवल्यास तू कष्टी होशील तर, राम करता म्हणल्यास तुला यश प्राप्त होईल. म्हणूनच परमार्थात अहंकार हा मोठा अडसर आहे, असे प्रतिपादन डॉ. सी.बी कुलकर्णी यांनी केले.


सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे यंदाच्या वर्षी ज्ञानविज्ञान पुरस्कार डॉ. चिंतामण भालचंद्र कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ.गौरी कुलकर्णी, कुमुदिनी बोपर्डीकर, लिलाताई गोविलकर, मंदाताई सोमणी, शोभा ढेपे, अॅड. नीलिमा औटी, निरंजना देशमुख, सर्वोत्तम क्षीरसागर, अॅड. मनोहर केसकर, डॉ.कोलते सर, हरिश्चंद्र थिगळे, स्नेहल वेलनकर, मंदाताई कुलकर्णी, पुष्पा चितांबर, बलभीम पांडव, बाजीराव जाधव, शुभदा जागीरदार, पुष्पा कोरे, संतोष गोरे, श्रीकांत नाईक, हेमंत लोहगावकर, पांडुरंग कुलकर्णी, वैशाली भणगे, आदिनाथ जोशी, महापुरुष सर, चारुशीला करवंदे, उमेश कुलकर्णी, अमोल हातवळणे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, आपण जे ज्ञान मिळवतो ते आपल्या उदर भरणासाठी असते. अनेक जण अनेक क्षेत्रात ज्ञानी झालेले आपण पाहतो. पण हे झाले व्यावहारिक ज्ञान पण खरे ज्ञान हे समर्थ सांगतात तसे आत्मज्ञान आहे. आणि त्यासाठी प्रत्येकाला जीवनात सद्गुरूंची आवश्यकता असते. त्यांनी दिलेला अनुग्रह आनंदाने स्वीकारला पाहिजे.

मंचचे अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी सर्वांची स्वागत व प्रास्ताविक केले. तर सन्मानपत्रा चे लेखन पुष्प चितांबर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सेक्रेटरी ज्योतीताई केसकर यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन निवेदिका भारती कुलकर्णी यांनी केला. बाजीराव जाधव यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अहिल्यानगरमध्ये ५ ते १४ मे दरम्यान 'बालदोस्तांसाठी खास नाट्य शिबीर'

### अभिनयाची 'पहिली पायरी'



नगर – जिल्हा शाखा गेल्या सात वर्षांपासून उन्हाळी बालनाट्य शिबिराचे आयोजन करत असते. यंदाच्या वर्षी ५ ते १४ मे दरम्यान सकाळी ९ ते १२ यावेळेत माऊली सभागृह सावेडी येथे शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी दिली आहे.

या हसत खेळत बालनाट्य शिबिरात मुलांना भाषा, शब्दोच्चार, आवाज, अभिनय, संवाद कौशल्य, सभाधिटपणा, रंगमंचावरील वावर, चित्रकला, नृत्यकला इत्यादी विषयांवर प्रात्यक्षिक होणार आहे. तसेच आगामी बालनाट्य स्पर्धेत सहभागी करून घेत मुलांचा आत्मविश्वास वाढवण्याचा मुख्य हेतू या शिबीरामागील असल्याचे प्रमुख कार्यवाह शैलेश देशमुख यांनी सांगितले.

या शिबीरासाठी वय वर्षे ७ ते १६ वयोगातील मुले– मुली सहभागी होऊ शकतात. शिबीराचा समारोप शिबीरार्थी बाल कलावंतांच्या प्रत्यक्ष सादरीकरणाने होणार आहे. मुला–मुलींच्या जडण घडणीत शिक्षणाला जसे महत्त्व आहे तसे आजच्या जगात सभाधीटपणा, संभाषण कला, सुप्त गुणांचा विकास आदि विषयांचा समावेश असलेली शिबिरे अहिल्यानगर शाखेतर्फे कायम आयोजित करण्यात येत असतात. या निमित्ताने व्यावसायिक बालनाट्याचा प्रयोग देखील घेण्याचा मानस आहे असे शिबीर प्रमुख सपना साळुंके यांनी सांगितले.

या वर्षी मार्गदर्शक म्हणून संकेत खेडकर (जय जय शनिदेव, कलर्स मराठी), जेष्ठ रंगकर्मी–दिग्दर्शक–अभिनेते सतीश लोटके, प्रशिक्षक सुज्ञ टोंपे, नृत्य दिग्दर्शक सागर अलचेट्टी, ज्येष्ठ चित्रकार सुजाता पायमोडे हे प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहेत. शिबिर यशस्वी करण्यासाठी अनंत जोशी, विराज अडगटला, देवीप्रसाद सोहोनी, प्रशांत सूर्यवंशी, अविनाश बोधले, तेजस अतितकर, तेजा पाठक, टीना इंगळे, सोनाली दरेकर, श्रिया देशमुख, ऋतुजा पाठक कार्यशील आहेत. अधिक माहिती व नावनोंदणी साठी ७२७६४९९७०९, ९२२५३१६६१५ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# मागासवर्गीय युवांसाठी उद्योजक जागरूकता कार्यक्रम मार्गदर्शक ठरेल

### अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे



उद्योजक जागरूकता आणि विशेष विक्रेता विकास कार्यक्रमाचे उद्घाटन करताना अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे.

### उद्योजक जागरूकता आणि विशेष विक्रेता विकास कार्यक्रमास जिल्हातून प्रतिसाद

नगर – ग्रामीण भागातील युवक युवतींमध्ये उज्वल भविष्यासाठी नक्की कशे पाऊले उचलायचे याबाबत मोठा संभ्रम असतो. यासाठी उद्योजक जागरूकता हा कार्यक्रम नवीन उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या ग्रामीण भागातल्या त्याचबरोबर मागासवर्गीय समाजातील युवक युवतींसाठी नक्कीच मार्गदर्शक ठरेल. नौकरी करण्यापेक्षा यशस्वी उद्योजक होऊन नौकरी देणारे बनून स्वतःसह कुटुंबाच्या परिस्थितीत बदल करा. आलेली छोटी संधीही सोडू नका. कारण जी संधी तुम्हाला छोटी दिसते त्या मधूनच वेगवेगळ्या वाटा मिळतात व तुमच्या उद्योगाला, कौशल्याला वेगवेगळे पैलू व दिशा मिळू शकतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्ञान हे सर्वश्रेष्ठ आहे, ते कायम घेत राहा हा संदेश त्यांनी आपल्या जीवनातून दिला आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी कायम ज्ञान मिळवण्याची जिज्ञासा बाळगा. हेच ज्ञान आणि कौशल्य तुमचं भविष्यातलं ब्रेड अॅण्ड बटर आहे, याची जाणीव बाळगा, असे आवाहन अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे यांनी केले.

अहिल्यानगर मध्ये दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्री संस्था (डिक्की) व नॅशनल एससी–एसटी हब यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील मागासवर्गीय युवांसाठी आयोजित उद्योजक जागरूकता आणि विशेष विक्रेता विकास कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी वैभव कलुबर्मे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयचे विभागीय सहाय्यक व्यवस्थापक राहुल मिश्रा, राष्ट्रीय लघु उद्योग निगमचे रितेश रंगारी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक शिवदास, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक आशिष नवले, सीए असोसिएशनचे विशाल गांधी, पुण्याच्या इंजिनीअरिंग इंडिया कंपनीचे नरेश रामटेके, इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अक्षय ओसवाल, कार्यक्रमाचे संयोजक व दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्री या संस्थेचे समन्वयक चंद्रकात काळोखे आदींसह केंद्र सरकारच्या विविध खात्याचे अधिकारी, तज्ज्ञ वक्ते उपस्थित होते. या मेळाव्यास जिल्ह्यातील सर्व भागातील सुमारे १५० युवक युवती उपस्थित होते.

प्रास्ताविकात चंद्रकात काळोखे म्हणाले, मागासवर्गीय युवांसाठी उद्योजक जागरूकता आणि विशेष विक्रेता विकास हा राज्यातील पहिला मेळावा सर्वप्रथम नगरमध्ये झाला. मागासवर्गीय युवक युवतींना उद्योग क्षेत्राकडे वळवून त्यांना यशस्वी उद्योजक होण्यासाठी नॅशनल एससी –एसटी हब कामकारत असून त्यांना प्रोत्साहन देत आहे. सरकारच्या नाव उद्योजकांसाठी बऱ्याच योजन आहेत या योजनांचा लाभ मागासवर्गीयांना मिळावा यासाठी प्रयत्नशील असून नव उद्योजकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करून सामाजिक समतेसोबतच आर्थिक स्वावलंबन महत्त्वाचे आहे. जेव्हा तरुण उद्योजक म्हणून उभा राहतो, तेव्हा तो संपूर्ण कुटुंबाचा आणि समाजाचा आर्थिक स्तर उंचावतो. 'डिक्की'च्या माध्यमातून आम्ही हीच आर्थिक क्रांती घडवण्याचा प्रयत्न करत आहोत, असे सांगितले.

उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी डिक्की मुख्यालयाचे प्रदीप बागुल यांनी केले. उद्योजक सचिन भारस्कर यांनी आभार मानले.

# समाजातील सर्व घटकांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तात्काळ लागू करण्यात यावे

### कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या अहिल्यानगर शाखेचे मुख्यमंत्री यांना निवेदन

नगर – महाराष्ट्रातील अनुसूचित जाती समाजातील सर्व घटकांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तात्काळ लागू करण्यात यावे, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई–मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठविण्यात आले असल्याची माहिती समितीचे निमंत्रक विकास उडाणशिवे यांनी दिली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना सामाजिक न्याय, समान संधी, शिक्षण, रोजगार व राजकीय सहभागासाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. मात्र, प्रत्यक्षात या आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नसून काही मोजक्या जातींपर्यंतच तो अधिक केंद्रित झाल्याची भावना इतर समाजघटकांमध्ये वाढत आहे.

शहर व ग्रामीण भागातील कचरा वेचक, तसेच कागद, काच, पत्रा गोळा करून उपजीविका करणाऱ्या कष्टकरी बांधवांपैकी मोठा हिस्सा मांग समाजाचा असून ते आजही अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. असंघटित क्षेत्रात काम करत असल्याने शिक्षण, आरोग्य, निवारा, रोजगार आणि सामाजिक सुरक्षेपासून ते मोठ्या प्रमाणात वंचित राहिले आहेत.

अनुसूचित जातींमधील अनेक घटक आजही आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शैक्षणिकदृष्ट्या मागास आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित असल्याने त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. यामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना पूर्णत्वास जात नसल्याची खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

मांग समाजातील नागरिक म्हणून इतर सर्व घटकांबद्दल आदर व एकात्मता राखण्याची भूमिका स्पष्ट करताना, आम्हाला कोणत्याही समाजाविरुद्ध संघर्ष नको; मात्र वंचित घटकांना न्याय मिळावा, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे. गेल्या अनेक दशकांपासून काही जातींना आरक्षणाचा अधिक लाभ मिळत असताना इतर घटक मागे राहिल्यामुळे समाजात नाराजी व असंतोष वाढत असल्याचेही निवेदनात नमूद आहे.

लोकसंख्या, शैक्षणिक प्रगती, आर्थिक स्थिती व सामाजिक मागासलेपण या निकषांवर आधारित शास्त्रीय व वस्तुनिष्ठ पद्धतीने उपवर्गीकरण करणे ही काळाची गरज असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. उपवर्गीकरणामुळे आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समतोलपणे पोहोचेल आणि दुर्लक्षित घटकांना संधी मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

अनुसूचित जाती समाजाचे तात्काळ उपवर्गीकरण करावे, लोकसंख्या व सामाजिक–आर्थिक निकषांनुसार आरक्षणाचे वाटप करावे, मांग समाजासह अत्यंत वंचित घटकांना प्राधान्य द्यावे, शिक्षण, नोकरी, शिष्यवृत्ती व योजनांमध्ये समान संधी उपलब्ध करावी, मागास घटकांसाठी स्वतंत्र विकास महामंडळ किंवा विशेष योजना सुरू कराव्यात, उच्चस्तरीय समिती स्थापन करून निश्चित कालमर्यादेत अहवाल सादर करावा, सामाजिक न्याय विभागामार्फत सर्वंकष माहिती संकलित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

हा विषय लाखो वंचित कुटुंबांच्या भवितव्याशी निगडीत असल्याने महाराष्ट्र शासनाने गांभीर्याने दखल घेऊन सर्वेक्षण, तज्ज्ञ समिती आणि वस्तुनिष्ठ आकडेवारीच्या आधारे तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब उडाणशिवे, जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे, सोमनाथ लोखंडे, विकास घाडगे, मनोहर चखाले, विकास वाल्हेकर, सागर खुडे, बाळुराम खुडे, सनी साबळे आदी पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.



जिल्हास्तरीय नार्को को–ऑर्डिनेशन सेंटर समितीच्या बैठकीमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते आदी.

# अमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई करा

### निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांचे निर्देश, जिल्हास्तरीय नार्को को–ऑर्डिनेशन सेंटर समितीची बैठक

नगर – जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री, साठा व तस्करीवर कठोर भूमिका घेऊन कारवाई करावी, तसेच अमली पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय नार्को को–ऑर्डिनेशन सेंटर समितीच्या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गिते बोलत होते. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गिते म्हणाले, शाळा व महाविद्यालये तसेच गर्दीच्या ठिकाणी पथनाट्यांच्या माध्यमातून जनजागृती अभियान राबवण्यावर भर देण्यात यावा. ड्रग्स डिटेक्शन किट्स व टेस्टिंग केमिकल्सची उपलब्धता सुनिश्चित करून तपास यंत्रणेला अधिक बळकटी देण्यात यावी. पोलीस विभाग, एनसीबी व राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या कारवाईची माहिती एकत्रित करून अद्ययावत डेटाबेस तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यात १ जानेवारी ते २८ एप्रिल २०२६ दरम्यान अमली पदार्थ बाळगणाऱ्या ९ प्रकरणांमध्ये १२ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लागवडीच्या प्रकरणातील २ गुन्ह्यांमध्ये ३ व्यक्तींवर, वाहतुकीसंदर्भातील ३ प्रकरणांमध्ये ८ व्यक्तींवर आणि अमली पदार्थ सेवनाच्या २६ प्रकरणांमध्ये ३२ व्यक्तींवर, अशा प्रकारे अमली पदार्थांच्या एकूण ४० प्रकरणांमध्ये ५५ व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती श्री. भोये यांनी यावेळी दिली.

# सीताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थ्यांचा निसर्गसंवर्धन उपक्रम; टाकाऊ वस्तूंमधून पक्षांसाठी शंभराहून अधिक घरटी केल तयार



नगर – हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात एक अनोखा निसर्ग उपयुक्त उपक्रम घेण्यात आला. पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी शंभराहून अधिक पक्षांसाठी सुंदर घरटी तयार केली. सध्या ऊन, उष्णता भयंकर आहे. मनुष्याला या अति उष्णतेचा त्रास होतो आहे. आज प्राणी, पक्षी यांची अवस्था देखील खूपच बिकट आहे. पक्षी हा निसर्गाचा एक प्रमुख घटक असून मनुष्यासाठी तो अतिशय जवळचा आहे. शहरात वृक्षांची कमतरता असल्यामुळे पक्षांसाठी सध्याच्या वातावरणात आपल्या गच्चीवर, अंगणात पाण्याची व्यवस्था करणे, त्यांच्या राहण्यासाठी घरटी तयार करणे आज आवश्यक आहे. याचा विचार करून सीताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्यांना घरातील टाकाऊ वस्तूंपासून कलात्मकरीत्या पक्षांसाठी घरटी तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना कला शिक्षक तथा मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी ही घरटी तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. विद्यार्थ्यांनी देखील या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद देत शंभराहून अधिक सुंदर घरटी तयार केली. या घरट्यांमध्ये पक्षी सहज बसू शकेल, त्यासोबत पाण्याची व्यवस्था, खाण्यासाठी दाणे ठेवण्याची व्यवस्था देखील विद्यार्थ्यांनी अतिशय कलात्मकतेने केलेली आहे.

या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा यांनी पारितोषिके दिली. अशाच उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. त्यांची निसर्गाप्रती असलेली कर्तव्याची भावना जागृत होते असे यावेळी त्यांनी आवर्जून सांगत सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

आपल्या कलेच्या माध्यमातून निसर्ग संवर्धन करता येते. हा संदेश या उपक्रमातून देण्याचा हेतू असल्याचे कलाशिक्षक गणेश नागपुरे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सांगितले.

पर्यवेक्षिका सौ. नंदा कानिटकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून स्वहस्ते त्यांना पारितोषिके दिली.

छंद वर्गाच्या माध्यमातून काही निसर्ग उपयुक्त कलात्मक करता येते हे विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. या घरट्यांसोबत आपला सेल्फी काढून विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. या उपक्रमात विद्यार्थ्यांसमवेत त्यांच्या पालकांनी देखील उत्तम सहभाग घेतला. या उपक्रमासाठी दीपक आरडे, चंद्रशेखर वाघ, अजय पुंड, अनंत जोशी, सौ. शितल शिंदे, सौ. निमा राहींज, सौ. वृषाली जोशी, श्रीमती क्रांती मुंदानकर, रवींद्र चोभे यांच्यासह शिक्षक– शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी सहकार्य केले.

# निरामय

## सर्दी आणि फ्लू एकत्र?

आदल्या दिवशी शिंक आल्यानंतर दुसऱ्या दिवशी तुम्ही तापाने फणफणत असता. सर्दी आणि फ्लूची लागण होण्याचा काळ आता सुरू झाला आहे. आपल्यापैकी कोणीही तो टाळू शकत नाही. तसंच कितीही घरगुती उपचार केले, डॉक्टरांकडून औषधं घेतली तरी व्हायरल जंतूसंसर्ग पूर्णपणे बरा होण्यासाठी काही कालावधी जावाच लागतो. व्हायरल जंतूसंसर्गाला एकत्रितपणे सर्दी आणि फ्लूचा हंगाम असं म्हटलं जातं. सर्दी आणि ताप यांचा संसर्ग एकत्रितपणे होऊ शकत नाही, असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात गळकं नाक, सर्दी आणि तीव्र स्वरूपाच ताप अशी लक्षणं एकत्रितपणे दिसू लागतात. यासोबतच अशक्तपणा आणि अंगदुखीही असते. सोप्या शब्दात सांगायचं तर फ्लू आणि सर्दी एकाच कुटुंबातल्या विषाणूंमुळे होत असले तरी एका विषाणूचा प्रतिकार करताना आपली प्रतिकारशक्ती दुसऱ्या विषाणूविरोधात तिच सुरक्षा देऊ शकत नाही. सर्वसाधारणपणे सर्दी ही सर्वसामान्यपणे आढळणाऱ्या ऱ्हिनोव्हायरसमुळे होते तर फ्लूचा



प्रसार इन्फ्लूएंझा विषाणूंमुळे होतो. हे विषाणू वेगवेगळ्या प्रकारचे असतात. या विषाणूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर रोगप्रतिकारक शक्ती वेगळ्या पद्धतीने प्रतिसाद देते. पहिल्यांदा रोगप्रतिकारक पेशी विषाणूची ओळख पटवतात. मग त्यांचा प्रसार थांबवण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्या टप्प्यात रोगप्रतिकारक शक्ती आपल्या सुरक्षा प्रणालीचा वापर करून प्रत्यक्ष विषाणूला लक्ष्य करायला बघते. हे जुळून आलं तर शरीर विषाणूंचा ठराविक वेळेत प्रतिकार करतं. त्याच वेळी शरीर अशक्त आणि कमकुवत झालं असताना दुसऱ्या विषाणूला सहज प्रवेश करायला वाव असतो. त्यामुळे थंडी आणि फ्लू हे विकार एकाच वेळी उद्‌भवू शकतात. याला सुपरइन्फेक्शन असं म्हटलं जातं.

**॥ व्याधी विचार ॥**

रूग्णाला सुपरइन्फेक्शन झालं तर शरीराची रोगप्रतिकारशक्ती हादरते आणि वेगळ्या प्रकारे प्रतिक्रिया देते.

कोणत्याही रूग्णाला सर्दी आणि फ्लूचा एकत्रितपणे सामना करता येत नाही. अशा वेळी प्रतिकारशक्तीला मदतीला यावं लागतं. अशा परिस्थितीत रोगप्रतिकारक पेशी विषाणूविरोधी स्थिती निर्माण करतात. यामुळे विषाणूंना अटकाव होतो. त्यांना शरीरात पसरायला फारसा वाव नसतो. या पेशी विषाणूंना प्रतिकार करतात. दुसऱ्या टप्प्यात पेशी विषाणूंना लक्ष्य करतात. विषाणू शरीराच्या बाहेर पडण्याआधी रोगप्रतिकारक पेशींनी त्यांना लक्ष्य केलेलं असतं. सुपरइन्फेक्शनला प्रतिबंध करण्यासाठी रोगप्रतिकारशक्तीची क्षमता वाढवणं गरजेचं आहे. नैसर्गिक उपायांनी रोगप्रतिकारक शक्ती बळकट करता येऊ शकेल. दुसरा मार्ग म्हणजे फ्लूची लस घेणं. यामुळे अत्यंत सक्षम अशा इन्फ्लूएंझा विषाणूविरोधात तुम्हाला संरक्षण मिळेल. तसंच हा विषाणू इतर लोकांमध्ये पसरण्यालाही अटकाव होईल.

०००

## अयोग्य आहार आजाराचे कारण

देशामध्ये ५६.४ टक्के अस्वास्थ्यकर आहार हे आजारांचे कारण आहे. 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि नॅशनल इन्स्टिट्यूट'ने १३ वर्षांच्या अभ्यासानंतर लोकांच्या खाण्याच्या सवयींबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. आरोग्यदायी जीवनशैली पाळल्यास आजारांमुळे होणारे मृत्यू टाळता येऊ शकतात, असे संस्थेचे म्हणणे आहे. मार्गदर्शक तत्त्वे सांगतात, की एखाद्या व्यक्तीला निरोगी राहण्यासाठी दररोज १,२०० ग्रॅम खाणे आवश्यक आहे. हे सुमारे २,००० कॅलरीज प्रदान करते. ताटात १०० ग्रॅम फळे, ४०० ग्रॅम हिरव्या भाज्या, ३०० मिली दूध किंवा दही, ८५ ग्रॅम डाळी किंवा अंडी, ३५ ग्रॅम काजू-बिया आणि २५० ग्रॅम धान्य पुरेसे आहे.

एका दिवसात २७ ग्रॅमपेक्षा जास्त तेल खाणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. मांसाहार करणाऱ्यांसाठी, दिवसाला जास्तीत जास्त ७० ग्रॅम चिकन किंवा मांस पुरेसे आहे. तुपापेक्षा मोहरीचे तेल जास्त फायदेशीर आहे मार्गदर्शक तत्त्वांनुसार, आपल्या अन्नामध्ये तीन प्रकारचे फॅटी ॲसिड असतात. त्यात 'सॅच्युरेटेड फॅटी ॲसिड, 'मोनो अनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड' आणि 'पॉली अनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड' समाविष्ट आहेत. जास्त सॅच्युरेटेड फॅटी ॲसिडस् कॅलरीचे प्रमाण वाढवते.

कॅलरीज वाढल्याने हृदयरोग आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. याशिवाय ट्रान्स फॅट टाळण्याचाही सल्ला देण्यात आला आहे. तूप, पाम तेल आणि खोबरेल तेलामध्ये सॅच्युरेटेड फॅटी ॲसिडचे प्रमाण सर्वाधिक असते. मोहरीच्या तेलात ते कमी प्रमाणात आढळते. म्हणजे तुपापेक्षा मोहरीचे तेल तुमच्यासाठी जास्त फायदेशीर आहे. मुलांवर अस्वस्थ आहाराचा परिणाम होत आहे. त्यामुळे लहान वयातच जास्त वजन, लठ्ठपणा आणि मधुमेहाचा त्रास त्यांना होत आहे. वाढत्या धोक्यांमुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. आरोग्यदायी खाद्यपदार्थांपेक्षा चरबी, साखर आणि मीठ जास्त असलेले खाद्यपदार्थ आता बाजारात सहज उपलब्ध आहेत. अस्वास्थ्यकर खाद्यपदार्थांच्या जाहिराती आणि मार्केटिंगमुळे हे खाद्यपदार्थ अधिक लोकप्रिय झाले आहेत आणि आजारांना कारणीभूत ठरत आहेत. अभ्यासातून असे दिसून आले आहे, की सहा महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलांना सेरेलॅक देणे प्रतिबंधित आहे.

**॥ डॉ. मेघा पठारे ॥**

चिन्मय प्रभू



'आयसीएमआर' अहवालाने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये हे नाकारले आहे. बसून पाणी प्यायल्यावर त्रास होत नाही तसेच उभे राहूनही पाणी पिणे चांगले आहे, असे अहवालात म्हटले आहे. 'आयसीएमआर'ने बॉडी मास वाढवण्यासाठी प्रोटीन सप्लिमेंट टाळण्याचा सल्ला दिला आहे. साखर, अंडी, दुग्धजन्य पदार्थ, सोया यासारख्या गोष्टी प्रोटीन सप्लिमेंटमध्ये वापरल्या जातात. याचे दररोज सेवन करणे म्हणजे आरोग्य धोक्यात घालण्यासारखे आहे. मातीचे भांडे स्वयंपाकासाठी सर्वात सुरक्षित आहे. हे इको फ्रेंडली आहेत. स्वयंपाक करताना तेलाचा कमी वापर होतो आणि अन्नाचे पोषण अबाधित राहते. चटणी, दही, सांबार यांसारखे आम्लयुक्त पदार्थ धातूच्या भांड्यांमध्ये ठेवू नयेत, असे अहवालात म्हटले आहे. स्टीलची भांडी वापरायला हरकत नाही. त्यातील रसायने अन्नात जात नाहीत. अन्न १७० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त शिजवले जाते, तेव्हा नॉन-स्टिक भांड्यांचा धोका उद्भवतो. या भांड्याचा लेप झिजतो तेव्हा त्याचा वापर बंद केला पाहिजे.

०००

## कारमध्ये कॅन्सर निर्माण करणारी रसायने

गेल्या दशकात कार खरेदी करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे; पण कार वापरल्याने आरोग्य बिघडू शकते. या संदर्भात एक संशोधन करण्यात आले आहे. कारमध्ये कॅन्सर निर्माण करणारी रसायने असल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे. अमेरिकेत झालेल्या एका अभ्यासात ही बाब समोर आली आहे. ती चिंताजनक आहे. सर्वात धोकादायक रसायन कारचे सीट बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फोममध्ये वापरले जाते. कार सीट कव्हरमध्ये अग्निरोधक रसायने वापरली जातात. हे रसायन श्वासाद्वारे शरीरात प्रवेश करते आणि कर्करोग होऊ शकते. पर्यावरण विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अभ्यासात हा दावा करण्यात आला आहे.

भारतात वापरल्या जाणाऱ्या सीट कव्हर्समध्ये किंवा सीटला मूळ आकार देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फोममध्ये या रसायनाचा वापर नगण्य असल्याचा दावा भारतातील फोम पुरवठादार करतात. कव्हर्स बसवल्यानंतर त्याचा प्रभावही संपतो; परंतु अभ्यासानुसार या फोम्समुळे रासायनिक घटक वाहनाच्या आत हवेत विरघळतात. ते श्वासाद्वारे तुमच्या शरीरात जातात. याचा अर्थ, तुम्ही तुमच्या कारमध्ये जास्त बसलात तर कर्करोगासारख्या आजारांचा धोका जास्त असतो.

संशोधनात असे म्हटले आहे, की वापरकर्त्याने दररोज कार चालवली, तर तो दररोज सरासरी एक तास कारमध्ये घालवतो. या वेळी, कारच्या सीटमध्ये असलेल्या स्वरूपात रसायने श्वासाद्वारे शरीरात प्रवेश करतात. परदेशात अग्निरोधक अनिवार्य आहे; परंतु लहान आग रोखण्यासाठी त्याचा वापर केला जातो. भारतात हे अनिवार्य नाही आणि अशा फोमचा पुरवठा येथे खूप कमी आहे.

**॥ डॉ. महेश दळे ॥**



कोणतेही केमिकल न वापरलेल्या फोमला लगेच आग लागते; पण अग्निरोधक वापरलेला फोम लवकर पेटत नाही. आगीपासून संरक्षण करण्यासाठी सीट कव्हरच्या फोममध्ये रसायने जोडली जातात; परंतु भारतात त्याचा धोका खूप कमी आहे.

०००

## वेळेआधी का येतं वार्धक्य?

माणसाचं वय वाढणारच, वार्ध्यक्याच्या खुणा दिसणारच. सुरकुतलेली त्वचा, पांढरे केस, डोळ्याखालची काळी वर्तुळं ही सर्व वाढत्या वयाची लक्षणं असतात. पण वय वाढण्याची ही प्रक्रिया व्यक्तीगणिक बदलत जाते. काही लोक वयापेक्षा जास्त थोराड दिसतात तर काहीजण वय वाढूनही तरूणच भासत असतात. प्रत्येकाला तरूण रहायचं असतं, दिसायचं असतं. वाढतं वय ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी चुकीच्या जीवनशैलीमुळे आपण वेळेआधीच म्हातारे दिसू लागतो. वेळेआधीच वार्धक्याच्या खुणा दाखवणाऱ्या चुका कोणत्या? जाणून घेऊ या.

✻ जंक फूड तसंच गोड पदार्थांचं अतिसेवन घातक ठरू शकतं. ताण आल्यावर किंवा दमल्यावर आपण गोड पदार्थ खातो. साखरेचं अतिसेवन शारीरिक आरोग्याला मारक आहे. शिवाय यामुळे तुमचं शारीरिक वय जास्त दिसू लागतं. गोड पदार्थ सतत खात राहिल्याने त्वचा सुरकुतलेली दिसते. तसंच चेहरा सुजल्यासारखा वाटतो.



✻ केस पांढरे झाले, चेहऱ्यावर सुरकुत्या आल्या, डोळ्यांखाली काळी वर्तुळं आली की ती लपवण्यासाठी आपण सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतो. या सौंदर्य प्रसाधनांमध्ये घातक रसायनं असतात. उत्पादनं विकत घेताना आपण त्यातल्या घटकांची माहिती घेत नाही. अशा रसायनांचे त्वचेवर दुष्परिणाम होतात आणि आपण म्हातारे दिसू लागतो.

✻ अपुरी झोप वय वाढण्याला कारणीभूत ठरू शकते. प्रत्येकाने किमान आठ तासांची शांत झोप घ्यायला हवी. पुरेशी झोप झाली नाही तर कामात उत्साह वाटत नाही. मरगळल्यासारखं वाटतं. चेहरा दमलेला वाटतो.

**॥ आपण कुठे चुकतो? ॥**

✻ मद्याच्या अतिसेवनामुळे आपण वेळेआधी म्हातारे होतो. मद्यामुळे चयापचय क्रिया मंदावते. आरोग्य बिघडतं आणि चेहऱ्यावर वय दिसू लागतं.


✻ प्रत्येकजण स्वत:च्या वैयक्तिक आयुष्यात गुंग झालेला असतो. ऑफिस, घरची कामं यातून सामाजिक आयुष्य जपायला वेळच मिळत नाही. नातेवाईक, मित्रमंडळींसोबत गप्पा होत नाहीत. कुटुंबाला फारसा वेळ देता येत नाही. या सगळ्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत राहतो. आपल्याला ताण येतो. त्यामुळे अधूनमधून मित्रमैत्रिणींना भेटा. नातेवाईकांचं स्नेहसंमेलन आयोजित करा. कुटुंबासोबत बाहेर फिरायला जा. यामुळे तुमचं मन आनंदी राहिल. मन आनंदी असलं की आरोग्यही उत्तम राहिल.

०००

## मूड वारंवार बदलतोय, सावधान!

वारंवार मूड बदलणे धोकादायक असू शकते. रॅपिड मूड स्विंगमुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. हे बायपोलर डिसऑर्डर, नैराश्य आणि इतर प्रकारच्या मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांमुळे असू शकते, म्हणून वेळेवर उपचार करणे आवश्यक आहे. आरोग्यतज्ज्ञांच्या मते, मूड स्विंग हा मानसिक विकार नाही. ही समस्या कोणालाही होऊ शकते. अनेकवेळा स्वतःची इतरांशी तुलना करणे, आजूबाजूचे वातावरण आणि हार्मोनल असंतुलन यामुळे या समस्येला वारंवार सामोरे जावे लागते. मासिक पाळी, रजोनिवृत्ती आणि गर्भधारणेदरम्यान महिलांना अनेकदा मूड स्विंग्जमधून जावे लागते. ही समस्या टाळण्यासाठी स्वतःची काळजी घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवा.

**॥ डॉ. प्रसन्न नेने ॥**



मूड स्विंगची लक्षणे नेहमीपेक्षा जास्त बोलणे आणि नंतर अचानक पूर्णपणे शांत होणे, चिडचिड होणे किंवा अतिउत्साही होणे, वाढीव ऊर्जा किंवा तीव्रतेसह ध्येय-केंद्रित क्रियाकलापांवर लक्ष केंद्रित करणे, नेहमीपेक्षा कमी झोप येणे, रडणे आणि नंतर खूप हसणे ही त्याची लक्षणे आहेत.


मानसिक आरोग्याच्या स्थितीमुळे वारंवार मूड बदलू शकतो. बायपोलर डिसऑर्डरदेखील यापैकी एक आहे. या विकाराला बळी पडल्यानंतर क्षणात आनंदी आणि क्षणात दुःखी वाटू लागते. नैराश्यात जास्त काळ राहणाऱ्यांना जलद मूड बदलण्याची समस्या असू शकते. त्यामुळे डॉक्टर जास्त ताण न घेण्याचा सल्ला देतात. त्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. जलद मूड बदलण्याचे एक कारण हार्मोनल असंतुलनदेखील असू शकते. हार्मोन्सचे काम शरीरातील अनेक प्रक्रिया नियंत्रित करणे आहे.

यात भावनांचाही समावेश होतो. अशा परिस्थितीत हार्मोन्स असंतुलित असतात, तेव्हा मूड बदलू शकतो. थायरॉईडमुळे मूड बदलण्याची तीव्र समस्यादेखील असू शकते. यामुळे मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मूड बदलू लागतो. त्यामुळे थायरॉईडवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

०००

## त्वचेला खाज का येते?

माझी त्वचा सतत खाजत असते. यामुळे मला सतत अस्वस्थ वाटत असतं. त्यातही सांध्यांजवळ म्हणजे गुडघे आणि कोपराजवळची त्वचा जास्त खाजते. दोन आठवड्यांपूर्वी मी डॉक्टरांकडे गेलो होतो. माझ्या हाता आणि पायांच्या वरच्या बाजूला पुरळ उठल्यामुळे मी डॉक्टरांचा सल्ला घेतला होता. मला अर्टिकारिया असल्याचं त्यांनी सांगितलं. मला खूप काळजी वाटत आहे. अशा प्रकारे खाज येणं हे लिम्फोमाचं लक्षण असल्याचं मी वाचलं आहे. मी पिरिटॉन हे औषध घेत होतो. यामुळे मला थोडं बरं वाटत होतं. हे ताणामुळे होतं असंही मी ऐकलं आहे. मला अधूनमधून ताण येतो. तसंच अपुऱ्या झोपेची समस्याही जाणवते. माझी नेमकी समस्या काय आहे? मला मार्गदर्शन करा.



**॥ विचारा प्रश्न ॥**


**उत्तर :** तुम्हाला ॲटॉपिक एक्झेमा असल्याचं लक्षणांवरून दिसून येत आहे. त्वचातज्ज्ञाकडून याची तपासणी करून घेणं गरजेचं आहे. ॲटॉपिक टेंडन्सी असलेल्यांना ही समस्या जाणवू शकते. अशा लोकांना ॲटॉपिक डर्मिटिटिस, अस्थमा अशा एकमेकांशी संबंधित विकारांपैकी एक किंवा सर्व विकार होण्याची शक्यता असते. त्यामुळे तुम्ही डॉक्टरांकडे जाऊन नीट तपासणी करून घ्यायला हवी.

०००

**॥ नवसंशोधन ॥**

### ताणामुळे कमी होते स्मरणशक्ती!


मध्यमवयातल्या ताणामुळे भविष्यात विस्मरणाचा धोका उद्‌भवू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. ताणामुळे मेंदूचा आकारही कमी होतो, असं संशोधकांचं म्हणणं आहे. ताणाशी संबंधित कॉर्टिसोल या हार्मोनच्या अतिप्रमाणामुळे असं होत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. कॉर्टिसोलचं प्रमाण जास्त असलेल्या लोकांची स्मरणशक्ती इतरांच्या तुलनेत मंदावली होती, असं शास्त्रज्ञांना आढळून आलं. तसंच इतर कामं करतानाही त्यांना त्रास होत असल्याचं दिसून आलं. त्यामुळे मध्यमवयातल्या ताणामुळे बरेच दुष्परिणाम होऊ शकतात, असंच यातून दिसून येतं.



**॥ डोळ्यांचं आरोग्य ॥**

### लेझी आयकडे लक्ष आहे का?


लहान मुलांमध्ये लेझी आयची समस्या असते. यात मुलांचा एक डोळा योग्य पद्धतीने विकसित होत नाही. यावर वेळीच उपचार केले नाहीत तर मेंदूला त्या डोळ्यासमोर दिसणाऱ्या प्रतिमेकडे दुर्लक्ष करायची सवय लागते. यामुळे मुलांच्या दृष्टीला कायमस्वरूपी धोका निर्माण होऊशकतो. या विकाराला ॲंब्लिओपिया असं म्हटलं जातं. लेझी आयमुळे मुलांना एका डोळ्याने अंधूक दिसतं. तर दुसऱ्या डोळ्याने स्पष्ट दिसतं. अशा वेळी अंधूक प्रतिमेकडे दुर्लक्ष करण्याची सवय मेंदूला लागते. यावर उपचार झाले नाहीत तर दृष्टी अधू होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



**॥ दंतारोग्य ॥**

### तोंडाचं आरोग्य आणि रक्तदाब

दात आणि तोंडाचं आरोग्य यांचा संबंध रक्तदाबाशी असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. तोंडाच्या आरोग्याची नीट काळजी घेणाऱ्या लोकांचा रक्तदाब नियंत्रणात असल्याचं शास्त्रज्ञांना आढळून आलं आहे. तसंच रक्तदाब कमी करणाऱ्या औषधांना त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचंही दिसून आलं आहे. पण गंभीर स्वरूपाचा हिरड्यांचा जंतूसंसर्ग असलेल्यांमध्ये रक्तदाब जास्त असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे तोंडाचं आरोग्य राखणं किती गरजेचं आहे हे आपल्या लक्षात येईल.



**॥ आजीबाईंचा बटवा ॥**

### पोटाच्या समस्यांवर रामबाण उपाय

सणासुदीचे दिवस, लग्नसराई म्हणजे भरपूर खाणंपिणं. यामुळे पोटाचे विकार उद्‌भवू शकतात. काही आयुर्वेदिक उपायांनी या तक्रारी बऱ्या करता येतात. बडिशेप, तुळस आणि लवंगांच्या एकत्रित सेवनामुळे आम्लपित्ताच्या तक्रारी दूर होऊ शकतात. ताकामुळे आम्लाची तीव्रता कमी होते. बद्धकोष्टतेसाठी सव्वा कप गरम पाण्यात एक चमचा शुद्ध तूप घाला. अर्धा चमचा मीठ घाला. नीट हलवून घ्या. हे पेय हळूहळू प्या. रात्रीच्या जेवणानंतर तासाभराने हे पेयं प्यायल्याने तुम्हाला बरं वाटेल. जुलाब झाले असतील तर दुधी खाता येईल. पोट फुगण्याची समस्या असेल तर गरम पाण्यात बडिशेप किंवा आल्याचे तुकडे घालून ते पाणी प्या.



# गृहिणी

## आरोग्य

### बोटे मोडत असाल तर...

तुम्हाला एक बोट असो वा सर्व, बोटे मोडल्याने नक्कीच आवाज येतो. अनेक लोक आरामात बसलेले असताना आपली बोटे मोडू लागतात, त्यांना वाटते की यामुळे त्यांना आराम मिळतो. सांधे मोडल्यानंतर होणारी वेदना, सूज किंवा सांध्यांची हालचाल कमी होणे, ही लक्षणे दुसऱ्या एखाद्या समस्येची असू शकतात, ती स्वतः त्या सवयीची नव्हेत. जर सांधे मोडल्यामुळे कधी वेदना, ताठरपणा किंवा सूज येत असेल, तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. बोटांचे सांधे मोडणे सहसा निरुपद्रवी असते, परंतु जर ही सवय तुम्हाला किंवा इतरांना अस्वस्थ करत असेल, किंवा तुम्हाला सांध्यांची दुसरी कोणती समस्या असेल आणि बोटांचे सांधे मोडल्यामुळे वेदना, ताठरपणा, ताण किंवा सूज येत असेल, तर तुम्ही ते थांबवले पाहिजे.

## पाककला

### कैरीचा छुंदा

**साहित्य :** खोबरी जातीच्या कैऱ्या, हळद, मीठ, लाल तिखट, साखर किंवा गूळ, जिरे.

**कृती :** कैऱ्यांची साल पूर्णपणे काढून त्या स्टेनलेस् स्टीलच्या किंवा पितळेच्या जाड किसणीने किसाव्यात. किसाला मीठ व हळद लावून एक ते दोन तास ठेवावे. त्याला पाणी सुटते. नंतर तो कीस हातात झेलून जेवढे निघेल तेवढेच पाणी काढावे. त्यानंतर एक वाटी किसाला दोन वाट्या साखर अथवा गूळ या प्रमाणात घेऊन ती साखर किंवा गूळ त्या किसात घालावा. आपल्याला कमी किंवा जास्त गोड हवे असेल, त्याप्रमाणे कमी किंवा जास्त साखर अथवा गूळ घालावा. नंतर एका उत्तम कल्हईच्या किंवा स्टेनलेस् स्टीलच्या पातेल्यात तो कीस घालून, पातेल्याचे तोंड फडक्याने घट्ट बांधून, ते पातेले चांगल्या उन्हात आठ दिवस ठेवावे. रोज सकाळी एकदा ते मिश्रण हालवावे. आठ दिवस झाल्यावर एक वाटी किसाला दोन चमचे लाल तिखट व जरा जाडसर कुटलेले जिरे एक चमचा या प्रमाणात घालावे. पुन्हा दोन दिवस ते पातेले फडके बांधून ठेवावे. नंतर बरणीत तो चुंदा भरावा. हे लोणचे वर्षभर टिकते.

## वास्तू

### बाल्कनीची वाढवा शोभा

* बाल्कनीतील वास्तुदोष दूर करण्यासाठी बाल्कनीत रोप लावली जातात. तसेच वॉल प्लांटने तुम्ही बाल्कनीची शोभा वाढवू शकतात.

* बाल्कनीचे छत तिरपे म्हणजे झोपडीच्या आकाराचे असावे जे उत्तर किंवा पूर्व दिशेला झुकलेले असावे.

## सौंदर्य

केस चमकदार करण्यासाठी घरीच केळी मॅश करा. त्यात दही आणि मध घालून पेस्ट बनवा. ते केसांना पूर्णपणे लावा.

## सल्ला

डाळिंबाचे चार भाग करा आणि ते पाण्यात बुडवा. पाण्याखालीच हाताने दाणे वेगळे करा. साल काढून टाका आणि पाणी गाळून घ्या. स्वच्छ दाणे तयार!

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ३ मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, विशाखा ०७।१०, सूर्योदय ०६ वा. २४ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल. अजीर्णचा त्रास संभवतो.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही. मित्र व स्नेही भेटल्यामुळे आनंदात असाल.

**कन्या** : रागावर आज संयम ठेवावा लागेल. खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू करू नका. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा- वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल.

**मकर** : हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे. कामात सांभाळूनच पुढे चला.

**मीन** : जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. सांसारिक किंवा इतर प्रश्नांमुळे मन उदास राहील.

## शब्दगंध क्र. ७४२१ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | ■ | ९ | |
| १० | | ११ | ■ | १२ | | | |
| ■ | ■ | १३ | १४ | ■ | ■ | | ■ |
| १५ | १६ | | | ■ | १७ | ■ | १८ |
| १९ | | ■ | | ■ | | ■ | |
| | ■ | २० | ■ | २१ | | | |
| २२ | | | | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) शिवाजी महाराजांचे एक सेनापती ('वेडात मराठे वीर दौडले सात'मधील) ७) एक पक्षी; कावळा; काग ८) ज्ञान; माहिती ९) नाव; गंधाचा टिळा १०) शंभराचा समूह; सेंच्युरी १२) उन्हात वाळण्यासाठी घातलेले धान्य वगैरे १३) गव्हाचे कणीदार पीठ १५) मराठीतील कॉम्प्युटर १९) वस्त्र फाटू नये म्हणून त्याच्या काठास घातलेली शिवण; हातात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना २१) चंगळ; विपुलता २२) अर्जुन व श्रीकृष्ण

**उभे शब्द :-** १) उजेड २) शक्ती; बळ; जोर ३) भूपती; नृप; राणीचा नवरा ४) जंगलाला लागलेली आग; दावानल ५) पशू; साप ६) उपभोक्ता; पती ११) पंचांगातील एक भाग; अर्धी तिथी १४) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार १५) काळजीपूर्वक रक्षण किंवा पालनपोषण; जतन १६) विशिष्ट समूह किंवा कंपू १७) राजा दशरथ व त्याच्या पुत्रांची कथा १८) तीनशेपासून हजारापर्यंत पायदळाची तुकडी २०) विविध; अनेकविध २१) वाद्य वाजविल्यानंतर त्याचा काही काळ राहणारा आवाज; शेवट; अखेर

### शब्दगंध क्र. ७४२० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | क | रा | ■ | सा | धा | सु | धा |
| ने | ता | जी | पा | ल | क | र | ■ |
| क | र | ■ | को | स | ■ | पा | रा |
| ■ | ■ | मो | ळी | ■ | हे | रं | ब |
| को | म | ल | ■ | अ | र | वी | ■ |
| ट | ■ | क | स | र | ■ | ■ | क |
| ■ | प | री | ■ | विं | चू | ■ | म |
| व | ळ | ण | ■ | द | र | व | ळ |

### फिल्मीचक्कर क्र. १२३४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि | व्या | भा | र | ती | ■ | ■ | आ |
| ■ | स | ■ | म | न | मो | ह | न |
| स | ■ | भै | व्या | ■ | ती | ■ | मि |
| ल | ■ | र | ■ | मे | ■ | लो | लो |
| मा | थ | वी | ■ | रे | ■ | ■ | स |
| न | ■ | ■ | ■ | ह | म | रा | ज |
| खा | ■ | मे | ■ | म | ■ | ■ | ना |
| न | य | रा | त | ■ | रा | जा | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : काही लोक साधे राहतात, म्हणून त्यांना कमी समजू नका शिंपल्यात पण मोती राहतात हे कधी विसरू नका.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### दुधाचा रंग पांढरा का असतो आणि गायीचे दूध हलके पिवळे का असते?

गाय असो वा म्हैस, दोघेही हिरवे गवत खातात. दुधाचा पांढरा रंग का आहे? काही वैज्ञानिक कारण आहे का, चला जाणून घेऊया.

दुधाच्या पांढर्या रंगाचे कारण म्हणजे त्यात असलेले पांढऱ्या रंगाचे केसीन. केसीन हे दुधात असलेल्या प्रथिनांपैकी एक आहे. केसीन दुधात असलेल्या कॅल्शियम आणि फॉस्फेटशी संयोग होऊन लहान कण तयार होतात. या कणांना मायसेल्स म्हणतात. जेव्हा सूर्यप्रकाश मायसेलवर पडतो तेव्हा तो प्रकाश शोषण्याऐवजी परावर्तित करतो, ज्यामुळे प्रकाश वातावरणात विखुरतो आणि या विखुरण्यामुळे दुधाचा रंग पांढरा होतो. याशिवाय, दुधात असलेली चरबी देखील त्याच्या पांढर्या रंगाचे कारण आहे. यावरून आपण असे म्हणू शकतो की दुधाचा पांढरा रंग असण्यामागे एक वैज्ञानिक कारण आहे. म्हैस किंवा बाळाला जन्म देऊ शकणाऱ्या कोणत्याही प्राण्याचे दूध पांढरे असते, परंतु गाय देखील एक आई असते, तरीही तिचे दूध हलके पिवळे असते.

यामागे एक वैज्ञानिक कारण आहे. प्रथम, हे गाईच्या दुधाच्या पातळपणामुळे घडते. दुसरे म्हणजे, दूध पांढरे करण्यात चरबी महत्त्वाची भूमिका बजावते, परंतु गाईच्या दुधात चरबीचे प्रमाण कमी असते. त्यात केसिनचे प्रमाण देखील कमी असते, ज्यामुळे गायीचे दूध हलके पिवळे रंगाचे असते. दुधात केसिन आणि चरबीचे प्रमाण जितके जास्त असेल तितके त्या दुधाचा रंग पांढरा होईल.

### सर्वात मोठे शस्त्र

एकदा, सम्राट अकबराने बिरबलाला विचारले, बिरबल, जगातले सर्वात मोठे शस्त्र कोणते आहे? महाराज! जगातले सर्वात मोठे शस्त्र म्हणजे आत्मविश्वास, बिरबलाने उत्तर दिले.

बिरबलाचे शब्द ऐकून सम्राट अकबराने ते मनात साठवून ठेवले आणि एके दिवशी त्याची परीक्षा घेण्याचे ठरवले.

एके दिवशी, योगायोगाने एक हत्ती पिसाळला. अशा परिस्थितीत, त्या हत्तीला साखळदंडांनी बांधून ठेवण्यात आले.

बिरबलाच्या आत्मविश्वासाची परीक्षा घेण्यासाठी, सम्राट अकबराने बिरबलाला बोलावून घेतले आणि हत्तीच्या माहुताला आज्ञा दिली की, बिरबल जवळ येत असल्याचे दिसताच त्याने हत्तीचे साखळदंड सोडावेत.

बिरबलाला याची कल्पना नव्हती. जेव्हा तो सम्राट अकबराला भेटायला दरबारात जात होता, तेव्हापर्यंत त्या पिसाळलेल्या हत्तीला आधीच सोडण्यात आले होते. बिरबल आपल्याच तंद्रीत मग्न होऊन चालत होता, तेव्हा त्याला एक हत्ती चिंकारत त्याच्या दिशेने येताना दिसला.

सोंड उंचावून तो हत्ती वेगाने बिरबलच्या दिशेने येत होता. बिरबल अशा ठिकाणी उभा होता की तो पळून जाऊनही सुटू शकत नव्हता. त्याच वेळी, बिरबलला एक कुत्रा दिसला. हत्ती अगदी जवळ आला होता, इतका जवळ की त्याने बिरबलला आपल्या सोंडेत गुंडाळले असते.

बिरबलने पटकन कुत्र्याचे मागचे पाय पकडले, त्याला आपल्या पूर्ण ताकदीने फिरवले आणि हत्तीवर फेकून दिले. जेव्हा तो घाबरलेला, किंचाळणारा कुत्रा हत्तीला धडकला, तेव्हा त्याच्या भयानक किंकाळ्यांनी हत्तीसुद्धा घाबरला, मागे फिरला आणि पळून गेला. सम्राट अकबराला बिरबलचे हे म्हणणे कळले आणि बिरबलने जे सांगितले ते खरे होते हे त्याला मान्य करावे लागले.

तात्पर्य : आत्मविश्वास हे सर्वात मोठे शस्त्र आहे.

## जीवन का अमृत (भाग १)



यह सिर्फ देहाभास से ऊपर आना है और इसमें इंसान मरता नहीं है। आपको इससे डरने की जरूरत नहीं है, इससे आपको कोई नुक्सान नहीं पहुँचेगा। हमें ऐसी ऊँची जिंदगी की ही कामना करनी चाहिए, क्योंकि इसी में सच्चा आनंद और शांति निहित है। ३०. भविष्यवाणियाँ हमेशा सच नहीं होती। मानवता के भाग्य का फैसला दयालु गुरु-सत्ता के हाथों में है। दिव्य नियमों को समझना इंसानी बुद्धि से बहुत परे की बात है। उत्तरी अमरीका या कहीं और के नामलेवाओं को किसी भी हो सकने वाली महाविपत्ति से डरने की कोई जरूरत नहीं है। जो लोग रास्ते पर हैं, उनकी देखभाल हो रही है और होती रहेगी; वे सिर पर कार्यरत गुरु-शक्ति की छत्रछाया में है, जो कि हर संभव सहायता दे रही है। हर दिन आध्यात्मिक निपुणता के लिए असीम अवसर लाता है और (क्रमशः)

### भविष्यवाणीयाँ

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### सजगता

आपल्याला वाटलं की, परिस्थितीने आणि लोकांमुळे आपण थकत होतो. याचा अर्थ, आपल्या दुबळेपणासाठी आपण इतरांना दोष देत होतो. आजच आपल्याला याची जाणीव झाली आणि आपण ही सवय बदलायचं ठरवलं, इतकंच पुरेसं नाही. तसंच उद्यापासून सगळं एकदम बरोबर होईल असाही विचार करू नका. सुरुवातीला ही सजगता आपल्याला कायम ठेवावी लागेल कारण अगदी आत्तापर्यंत आपण या बाबत अजिबातच जागरूक नव्हतो. आता आपण आपला संस्कार बदलत आहोत. हा स्व-परिवर्तनाचा प्रवास आहे. आज ठरवलं आणि उद्या मिळवलं असं हे उद्दिष्ट नाही. कारण इतरांना दोष देण्याचा आपला संस्कार हा एका रात्रीत तयार झालेला नाही.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा : हेल्मेट सक्ती लागली आहे ना आता...

बायको : हे काय नवीनच

बायको : हेल्मेट न घातल्यास ५०० रुपये दंड घेण्याऐवजी ज्याने हेल्मेट घातले आहे त्याला १०० रू. बक्षीस द्या म्हणावं मग बघा चार दिवात शहरच काय संपूर्ण देश सुधारेल.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* रणजी करडक स्पर्धा २०२४-२५ मध्ये सर्वाधिक धावा कोणी केल्या?

– यश राठोड

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - परिचारिका

खरं तर दवाखान्यात जायचं म्हंटलं की नको वाटतं. लहान मुला, मुलींना दवाखाना म्हंटलं की इंजेक्शन, गोळ्या – औषध हेच लक्षात येतं. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हायची वेळ आली की थोडसं का होईना पण रुग्ण घाबरतो. हे घाबरणं अगदी स्वाभाविक आहे. ॲडमिट झाल्यानंतर तपासण्या झाल्यावर ऑपरेशन करण्याविषयी डॉक्टरांनी सांगितले तर घबराट वाढते. हे सुध्दा अगदी स्वाभाविक आहे. ॲडमिट व्हायचं म्हंटलं की बेड, रुम, सलाईन इत्यादि ओघाने आलंच. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार रुग्ण आणि डॉक्टर ह्यांच्यामधील दुवा असते ती परिचारिका. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होणारे वेगवेगळ्या स्वभाव वैशिष्ठ्यांचे रुग्ण हाताळतांना परिचारिकांना खूपच कसरत करावी लागते. विविध स्वभाव वैशिष्ठ्यांच्या रुग्णांना, रुग्णांच्या कलेनं समजुन घ्यावं लागतं. रुग्णांना मानसिक आधार द्यावा लागतो ह्यासह रुग्णांच्या नातेवाईकांनाही सांभाळुन घ्यावं लागतं. हे सगळे करत असतांना डॉक्टरांनी विशिष्ठ वेळी द्यावयास सांगितलेली औषधं, गोळ्या इत्यादि त्या त्या विशिष्ठ वेळी द्याव्या लागतात, रुग्णाचा बीपी तपासणे, इंजेक्शन देणे, ड्रेसिंग करणे हे सगळे करत असतांना स्वतःच्या आरोग्याची काळजीही घ्यावी लागते.

विविध आचार, विचार आणि विकारांच्या रुग्णांना सांभाळणं, जपणं, वेळच्या वेळी औषधं देणं हे अत्यंत महत्वाचं आणि जीवनावश्यक कार्य करतांना परिचारिकांची होणारी शारिरिक अन् मानसिक धावपळ पाहुन, रुग्णाचा नातेवाईक म्हणून आपल्याला नक्कीच हे काम परिश्रमपूर्वक करण्याचं असल्याचं लक्षात येतं. रुग्णाची सेवा- सुश्रुषा करण्याचं भाग्य त्यांना मिळतं हे निश्चितच चांगलं आहे आनंददायी आहे. आपल्या असं लक्षात येतं की घरातला एखादा सदस्य ॲडमिट असेल तर घरातल्या सगळ्यांचीच धावपळ होते. एका वॉर्डातील वेगवेगळ्या रुग्णांची सेवा, सुश्रुषा करतांना परिचारिकांचे आधाराचे शब्द रुग्णाला लवकर बरं होण्यासाठी उपयोगी पडतात. हा शब्दस्पर्श रुग्णाला सकारात्मक करतो, उभारी देतो. आजपर्यंत रुग्णांच्या किती नातेवाईकांनी परिचारिकांच्या ह्या सेवा, सुश्रुषेचा विचार केला असेल ? अगदी मोजक्याच व्यक्तींनी हा विचार केला असेल.

परिचारिकांच्या दिवसा, रात्रीच्या शिफ्टस्, अगदी अर्ध्या रात्री ॲडमिट होणारे रुग्ण... सेवा, सुश्रुषा ही फक्त क्रिया नाही तर माया, ममत्व, रुग्ण लवकर बरा होण्यासाठीची मनापासूनची प्रार्थना असते. परिचारिकांचं कुटुंब, कुटुंबातील सदस्य, सदस्यांचा व्यवसाय, नोकरी, त्यांची आवड-निवड हे सगळं सांभाळुन हॉस्पिटलमध्ये येणं. ह्यासह परिचारिकांचं स्वतःचं जगणं, आवड-निवड, छंद, स्वआरोग्याची काळजी हे सगळं पाहुन हॉस्पिटलमधील रुग्णांची सेवा, सुश्रुषा करणं खरं तर हा प्रवास अत्यंत खडतर आहे. पण हे सगळं लिलया पार पाडत त्यांचं काम चालु असतं. विविध आचार, विचारांचे रुग्ण त्यांना पाहायला मिळतात पण ह्या सगळ्यांचा आचार, विचार, स्वभाव स्वीकारुन कर्तव्य करत राहणं – ह्या त्यांच्या सेवेला, सुश्रुषेला मनापासुन सलाम. रुग्णाला लवकरात लवकर बरं वाटावं ह्यासाठी त्यांची मनापासूनची इच्छा, तळमळ आपल्या लक्षात येते. एक रुग्ण बरा होऊन गेला की दुसरा रुग्ण येतो, दुसरा रुग्ण बरा होऊन गेला की तिसरा रुग्ण येतो. वास्तविक हा प्रवास न संपणारा आहे. रुग्ण सेवेत आयुष्य समर्पित करणाऱ्या अनेक नर्स आपण पाहिल्या आहेत. ह्या सगळ्या धावपळीत, त्यांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणंही अत्यंत महत्वाचं आहेच, ती आरोग्याची काळजी त्यांनी घ्यावीच. आपल्याला ज्यांचा आधार वाटतो त्यांच्या आरोग्याची काळजी आपल्याला वाटणं स्वाभाविक आहे.

'सिस्टर, एवढं ड्रेसिंग करा' – हे वाक्य एखादा रुग्ण म्हणतो. तेव्हा (परिचारिका) सिस्टर लगेचच ड्रेसिंग करतात. आपल्या कुटुंबातलं नातं त्या परिचारिकेशी सिस्टरच्या माध्यमातुन जोडलं जातं. आपली काळजी घेणारी, आपल्या आजारपणात आपली सेवा, सुश्रुषा करणारी ही बहिण, आईच्या जागी असते. आई, आपल्या लेकराची काळजी घेते तसं सिस्टर आपल्या भावाची काळजी घेत असते.

फ्लोरेन्स नाईटिंगल ह्या नर्स (परिचारिका). त्यांचा जन्मदिवस १२ मे हा जागितक नर्स (परिचारिका) दिन म्हणून साजरा केला जातो. १२ मे रोजी जागतिक नर्स दिनानिमित्त हॉस्पिटलमधील नर्सचा सन्मान करणं हे आपलं कर्तव्य आहे. हॉस्पिटलमधील रुग्णांची सेवा, सुश्रुषा करतांनाच रुग्णांना मानसिक आधार देणाऱ्या, रुग्ण लवकर बरा व्हावा म्हणून मनापासून प्रार्थना करणाऱ्या परिचारिकांसाठी ( आपल्या बहिणींसाठी) आपणही मनापासून प्रार्थना करुया की त्यांना चांगले आयु-आरोग्य लाभावे. परिचारिकांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, कुटुंबाचीही काळजी घ्या. कोरोनाच्या काळात तुम्ही केलेली सेवा, सुश्रुषा आजही आणि उद्याही आम्ही विसरणार नाही.

(लेख क्र.५९९)

**– सुनील राऊत**

माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर

मो.९८२२७५८३८३

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### पिस्ता

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : पिस्ता चवीला मधुर, किंचित कडवट, विपाकी, उष्ण वीर्यात्मक असून, पित्तकर व कफवातघ्न आहे. ते पचायला जड व धातूंचे पोषण करणारे, रक्तदृष्टी नाहीसे करणारे आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : पिस्त्यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, प्रथिने, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ व जीवनसत्त्व हे सर्व घटक भरपूर प्रमाणात असतात. उपयोग : १) पिस्त्यामध्ये जीवनसत्त्वातील थायमिन, नायसिन, रिबोफ्लेविन, कॅरोटीन हे घटक असल्यामुळे मज्जासंस्थेच्या कार्यासाठी पिस्तासेवन उत्तम ठरते. २) दुधामध्ये पिस्त्याची पूड टाकून प्यायल्यास मेंदूचे कार्य उत्तमप्रकारे चालते. लक्षणे जाणवत नाहीत. थकवा, नैराश्य ही

३) स्मृतिभ्रंश, विस्मरण जाणवत असेल, तर नियमितपणे चार ते पाच पिस्ते दुधात टाकून खावेत. ४) चांगले कोलेस्टेरॉल निर्माण होऊन हृदयविकार टाळण्यासाठी नियमितपणे पिस्तासेवन करावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# 'श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी'ला ४ कोटी ३२ लाखाचा विक्रमी निव्वळ नफा


श्रीगोपाल धूत किसनलाल बंग राजेंद्र मालू

नगर – श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीला सर्व प्रकारच्या तरतूदी वजा जाता ३१ मार्च २०२६ अखेर ४ कोटी ३२ लाख रुपयांचा विक्रमी निव्वळ नफा झाला आहे. तसेच संस्थेकडे वर्ष अखेर ११६ कोटी २० लाख रुपयांच्या ठेवी असून कर्ज वितरण ७७ कोटी १ लाख रुपयांचे झाले आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन किसनलाल बंग यांनी दिली.

संस्थेच्या संचालक मंडळाची सभा नुकतीच चेअरमन किसनलाल बंग यांचे अध्यक्षतेखाली पार पडली संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक सी.ए. एन.जे.लोहे अँण्ड कंपनी चे सी.ए. पुनीत व्होरा यांनी सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद सादर केला. सभेला श्रीगोपाल धूत, व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू, सुधीर झालानी, राजेंद्र गुजराथी, लक्ष्मीकांत झंवर, विश्वनाथ कासट, गोपाल मणियार, राजेंद्रकुमार कंत्रोड, ड. अशोक बंग, राजकमल मिनियार, शोभा राठी, अनुरिता झगडे, देवराव साठे उपस्थित होते. तसेच व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक, प्रशांत टोणपे व ओ.एस.डी कुमार आपटे हे देखील उपस्थित होते. चेअरमन किसनलाल बंग व व्हा.चेअरमन राजेंद्र मालू यांचे सर्व उपस्थित संचालकांनी अभिनंदन केले.

चेअरमन किसनलाल बंग म्हणाले की, संस्थेने इतर बँकेत ९५.२४ कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केली आहे. रिझर्व्ह फंड व इतर निधी ३८.४० कोटी रुपये उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या नेट एन.पी.ए. नेहमी प्रमाणे शून्य आहे. संस्थेचे संस्थापक संचालक श्रीगोपाल धूत यांचे बहुमोल मार्गदर्शन, शिस्तबध्द व उत्कृष्ट कार्यपद्धती, व्हा.चेअरमन राजेंद्र मालू व सर्व संचालकांचे योगदान यामुळेच संस्थेची सातत्याने प्रगती होत आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे सभासद, ठेवीदार व कर्जदार यांच्या सहकार्यामुळेच भरीव कार्य करता आले. तसेच संस्थेच्या प्रगतीत सर्व स्टाफचाही मोलाचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सी.ए. पुनीत व्होरा यांनी संस्थेला वेळोवेळी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल त्यांचे, संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांचे हस्ते पुष्प गुच्छ देऊन आभार मानण्यात आले.

संस्थेकडून अल्पदरात कॅशक्रेडिट कर्ज, टर्म लोन, वाहन कर्ज आणि सोने तारण कर्ज फक्त ८ टक्के व्याजदराने दिले जाते. याचा सर्व ग्राहकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले.

संचालक मंडळाचे सभेत संचालक लक्ष्मीकांत झंवर, राजेंद्र गुजराथी, गोपाल मणियार यांनी संस्थेच्या आगामी वाटचालीकरिता व प्रगतीकरिता आपले विचार व्यक्त केले. सभेच्या शेवटी व्हा. चेअरमन राजेंद्र मालू यांनी आभार मानले.

# पगार रखडले, पेन्शन थांबली; महापालिका कर्मचाऱ्यांच्या न्यायासाठी ९ मे रोजी पुण्यात निर्णायक राज्यस्तरीय बैठक

नगर – राज्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वेतन, पेन्शन आणि इतर प्रलंबित प्रश्नांनी आता गंभीर रूप धारण केले असून या पार्श्वभूमीवर राज्यभरातील कामगार संघटना एकवटल्या आहेत. महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाच्या पुढाकाराने ९ मे रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथील श्रमिक भवन येथे राज्यस्तरीय महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीकडे राज्यातील हजारो महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले असून त्यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसल्याबाबत, तसेच विविध प्रलंबित प्रश्नांबाबत महासंघाचे सरचिटणीस कॉम्रेड उदय भट यांच्याकडे निवेदन सादर केले होते. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत महासंघाने तातडीने राज्यभरातील महानगरपालिका संघटनांना एकत्र येण्याचे आवाहन करत ही बैठक बोलावली आहे. यामुळे स्थानिक पातळीवरील प्रश्नांना आता राज्यस्तरावर मोठे व्यासपीठ मिळाले आहे.

महासंघाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील ड वर्ग महानगरपालिकांना जीएसटी (एलबीटी) अनुदान वेळेवर मिळत नसल्यामुळे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. फेब्रुवारी २०२६ चे अनुदान उशिरा मिळाले, तर मार्च २०२६ चे अनुदान अद्याप प्राप्त झालेले नाही. त्यामुळे अनेक महानगरपालिकांची आर्थिक स्थिती डळमळीत झाली असून कर्मचाऱ्यांचे वेतन व पेन्शन वेळेवर देणे कठीण झाले आहे. परिणामी काही ठिकाणी कर्मचाऱ्यांना तब्बल २ ते ३ महिन्यांनी पगार दिला जात असून पेन्शनधारकांनाही मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

काम करूनही वेळेवर वेतन मिळत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च आणि दैनंदिन गरजा भागवताना कर्मचाऱ्यांची मोठी कसरत होत आहे. या परिस्थितीत राज्यातील सर्व महानगरपालिका कामगार संघटनांनी एकत्र येऊन यावर ठोस भूमिका घेणे अत्यावश्यक बनले आहे.

या पार्श्वभूमीवर पुण्यात होणाऱ्या बैठकीत विविध महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. विशेषतः मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन सादर करणे, शासनाकडून अनुदान वितरणाची प्रक्रिया गतीमान करणे, तसेच आवश्यक असल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढील रणनीती आखली जाणार असून ही बैठक निर्णायक ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

महासंघाचे सरचिटणीस कॉम्रेड उदय भट यांनी राज्यातील सर्व महानगरपालिका कामगार संघटनांना या बैठकीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. प्रत्येक संघटनेने किमान पाच प्रतिनिधींसह उपस्थित राहून आपल्या महानगरपालिकेतील वेतन, पेन्शन व इतर थकबाकींचा तपशील लेखी स्वरूपात सादर करावा, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे सर्व प्रश्नांचे वस्तुनिष्ठ चित्र समोर येऊन त्यावर प्रभावी तोडगा काढणे शक्य होणार आहे. अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल व सचिव आनंद वायकर यांनी सांगितले की, ही बैठक कामगारांच्या हक्कासाठी अत्यंत महत्त्वाची असून राज्यातील सर्व संघटनांनी एकजुटीने सहभागी होणे गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतन व पेन्शनचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून त्यांच्या जगण्याशी संबंधित आहे. त्यामुळे यावर तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे.

राज्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वाढत्या असंतोषाला आता संघटित दिशा मिळत असून पुण्यातील ही बैठक पुढील आंदोलनाची दिशा ठरवणारी ठरणार आहे. कामगारांच्या हक्कासाठीचा हा लढा अधिक तीव्र होण्याची शक्यता असून शासनाने याची तातडीने दखल घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## : सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग :

**मे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या.अ.नगर महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर यांचे कार्यालय.**

### जाहीर समन्स

डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संत आण्णा चर्च, कलेक्टर कचेरीजवळ, अहिल्यानगर ता/जि. अहिल्यानगर या संस्थेने त्यांचे कर्जदार/जामिनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणे बाबत प्रस्ताव दिनांक २८/०१/२०२६ रोजी या कार्यालयास दाखल केला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक २८/०१/२०२६ रोजी सुनावणीची नोटीस देऊन त्यांची सुनावणी दि. २५/०२/२०२६ व दि.११/०३/२०२६ व दि. २५/०३/२०२६ व दि.१५/०४/२०२६ व दि.२९/०४/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाबदेणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याची **सुनावणी दिनांक** ०६/०५/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता मा. सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर महात्मा फुले चौक, गाळा नं.४, पहिला मजला.जीएस महानगर बँकेशेजारी, अहिल्यानगर यांचे कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केले प्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.नं. | दावा क्र. | कर्जदार/जामिनदाराचे नांव | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २६५<br>--<br>२०२६ | जाबदेणार १)श्री. गायकवाड़ अनिल धनजी.<br>राहणार C/O-नलावडे रमेश, घन. ५९३, सुवर्णनगर बनेश्वर मंदिर, केडगाव<br>जाबदेणार २) श्री सूर्यवंशी रमेश नाना<br>राहणार–C/O-गायकवाड भास्कर भोयरे पठार चर्चजवळ ता/जि–अ.नगर<br>जाबदेणार ३) श्री– सावंत राहुल संपत<br>राहणार त्रिरत्न निवास घनं. २५, जगदंबा क्लासजवळ, मोहिनीनगर, केडगाव<br>जाबदेणार ४) सौ. गायकवाड स्मिता अनिल<br>राहणार–C/O-नलावडे रमेश, घन. ५९३ सुवर्णनगर, बनेश्वर मंदिर, केडगाव | १,५७,३३६/- |
| २ | २६६<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री शिंदे प्रविण मनोहर<br>रा.घ०७, आंधळेचौरे रो. हौ. रेणुकामाता मंदिर, मोहिनीनगर,केडगाव,अहिल्यानगर<br>२ ) श्री. गुंड विकास विजय<br>राहणार–गुंडमळा, सोनेवाडी रोड, केडगाव देवी, अहिल्यानगर<br>३) श्री टेकाळे उमेश बालाजी<br>राहणार–C/O पुराणे दिलीप सन २११/३, रो बंगलो मोहिनीनगर केडगाव<br>४) श्री– शिंदे बन्शी भुजाबा<br>राहणार– घाटदेऊळगाव ता–आष्टी जि–बीड | १,१३,६९३/- |
| ३ | २६७<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) सौ. गाडेकर सुनिता दिपक<br>राहणार घर नंबर २९, कॅन्टोन्मेंटचाळ, राममंदिराजवळ भिंगार अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री कांबळे प्रितम दिपक<br>राहणार– घर नंबर १९४. भास्कर कॉलनी, लालटाकी, अहिल्यानगर,<br>३) श्री जगधने हेमंत रमेश<br>राहणार घर नं. ३६७ सदरबाजार, पोलीस स्टेशनजवळ, भिंगार, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्री गाडेकर दिपक अर्जुन.<br>राहणार घर नं. २९ कॅन्टोन्मेंट चाळ, राम मंदिराजवळ, भिंगार, अहिल्यानगर | १,२३,८१८/- |
| ४ | २६८<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री नवगिरे भागचंद सुधीर<br>राहणार गायकवाड चाळ स्टेशन रोड, कोठी, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री ढगे शशिकांत दादासाहेब<br>रा– फ्लॅट नं. ४१ पंकज कॉलनी, समतानगर, टीव्ही सेंटरजवळ, सावेडी अ नगर<br>जाबदेणार ३) श्री– पाटोळे साहेबराव कान्हूजी<br>राहणारः केदारवस्ती फरियाबाग, सोलापूर रोड, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्री. नवगिरे सुधीर भागचंद<br>राहणार गायकवाड चाळ, स्टेशनरोड कोठी आहिल्यानगर | १,३६,९७४/- |
| ५ | २६९<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री केदारी प्रकाश शाम<br>राहणार सन–६२/१, केदारवस्ती फरियाबाग सोलापूररोड, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री. सुपेकर प्रमोद मच्छिंद्र<br>राहणार– C/O हडके विनायक, घनं. ७. यशनिवास दूधसागर केडगाव अ.नगर<br>जाबदेणार ३) श्री सूर्यवंशी राजेश वसंत<br>राहणार– घर नंबर २६ गावठाण, वाकोडी ता.जि अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ. केदारी सारिका प्रकाश<br>राहणारः– सन–६२/१, केदारवस्ती फरिपाबाग, सोलापूररोड अहिल्यानगर | २,४९,१२४/- |
| ६ | २७१<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री ढवळे गोरख विठ्ठल<br>राहणार पदमपुरवाडी, वाळकी रोड, वाकोडी. ता जि अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री औताडे सागर दिलीप.<br>राहणार: सर्वे नं.५०/३. प्लॉट नं–५, मुकुंद स्टील जवळ, बुरुडगाव रोड, अ.नगर.<br>जाबदेणार ३) श्री– वाघ दिनेश रमेश.<br>राहणार– पदमपुरवाडी, वाळकीरोड, वाकोडी ता/जि.अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ ढवळे वैशाली गोरख.<br>राहणारः– पदमपुरवाडी वाळकी रोड, वाकोडी ता/जि अहिल्यानगर | १,००,७६३/- |
| ७ | २७२<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री गुंड विकास विजय<br>राहणार– गुंडमळा सोनेवाडी रोड, केडगाव देवी, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री– घेवारे महेश गणपत.<br>राहणार: घर नंबर ८६ शाहूनगर गार्डनजवळ, केडगाव अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) शिंदे प्रविण मनोहर<br>राहणार घर नं ०७, आंधळेचौरे रो. हौ. रेणुकामाता मंदिर मोहिनीनगर, केडगाव<br>जाबदेणार ४) श्री– गुंड विजय सूर्यभान<br>राहणार– गुंडमळा, सोनेवाडी रोड, केडगाव देवी अहिल्यानगर | ८५,८६८/- |
| ८ | २७४<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री. शहा अभिजीत जगदीश<br>राहणार: घर नं. ३४२५. ख्रिस्तगल्ली, गणपती मंदिरासमोर, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री– भल्ला मनोज हरभजन<br>राहणार– फ्लॅट नं.५. अप्सरा अपार्टमेंट, वसंत टेकडी, वीरसावरकररोड, औरंगाबाद रोड, सावेडी अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री– तवले अमित मोतीलाल राहणार घर नंबर ४६२५, नगरपालिका ऑफिससमोर, तवलेवाडा, माळीवाडा, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्री– शहा विशाल प्रकाश.<br>राहणार– घर नंबर ३४२५, ख्रिस्तगल्ली, गणपती मंदिरासमोर, अहिल्यानगर | ६०,६४,२९२/- |
| ९ | २७५<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्रीमती मोहम्मद चाँदबी कलाम,<br>राहणार–C/O हजारे पुष्पा प्रकाश घर नं १/२/७९ सन १/३३३. गणेश चौक, गणपती मंदिरामागे रेणुकानगर बोल्हेगाव अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्रीः– भिंगारदिवे किसन शाहू<br>राहणार–शॉप नं ८. सन ७९/२, १/ गणेश चौकाजवळ बोल्हेगाव अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्रीमती– वाघ शांता बाळासाहेब<br>राहणार–घ.नं. ६७२७, लांडेगल्ली, नानापाटील तालीमसमोर, नालेगाव अ.नगर.<br>जाबदेणार ४) श्री मोहम्मद कलाम मुस्लीम<br>राहणार:– C/O – हजारे पुष्पा प्रकाश घर नं १/२/७९ सन १/३३३, गणेश चौक, गणपती मंदिरामागे, रेणुकानगर, बोल्हेगाव अहिल्यानगर | ८१,२४८/- |
| १० | २७६<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री. भुजबळ देवेंद्र बाळासाहेब<br>राहणार घर नंबर २५ खळेवाडी, भिंगार, रयत शाळेशेजारी, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री. शिरसाठ राजू दादू<br>रा. घर नं १/९–टी एम.इ.एस. कॉलनी चांदनी चौक, सोलापुर रोड, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री लुहाण लक्ष्मण पहिलाजरॉय.<br>राहणार– C/O- भळगट एफ बी प्लॉट नं १ बडोदा बँक कॉलनी, सावेडी अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्रीमती भुजबळ रूपाली देवेंद्र<br>राहणार घर नंबर २५ खळेवाडी भिंगार, रयत शाळेशेजारी, अहिल्यानगर | ९४,१२३/- |
| ११ | २७७<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री चाबुकस्वार सुभाष साहेबराव<br>जाबदेणार २) श्री– चाबुकस्वार साहेबराव आनंदा<br>दोघे राहणार नारायण डोहो चांगदेव विद्यालयाजवळ, शनिराज लॉनसमोर, ता.अहिल्यानगर | २६,०७७/- |
| १२ | २७८<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री. भिंगारदिवे अजय तुकाराम<br>राहणार घर नंबर ७०२, सदिच्छा निवास, बौद्ध विहारजवळ, भीमनगर भिंगार अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री गायकवाड जयंत दादासाहेब.<br>राहणारः भिमराज सावली निवास, बुद्धवस्ती, लालटाकी, पंचशील शाळेजवळ, सिद्धार्थनगर अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री– ससाणे राजू पांडुरंग<br>राहणार– साई स्वप्न १ प्लॉट नं. एलटी १४ गेस्ट हाऊससमोर, सावेडी, अ.नगर<br>जाबदेणार ४) श्रीमती भिंगारदिवे संध्या अजय<br>राहणार–घर नंबर, ७०२ सदिच्छा निवास बौद्ध विहारजवळ, भिंगार अ.नगर | १,३४,६७४/- |
| १३ | २७९<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री भिंगारदिवे अशोक नामदेव<br>राहणार घर नं २९६, हरीजनवस्ती, चर्चजवळ, आगडगाव ता/जि अहिल्यानगर.<br>जाबदेणार २) श्री– उजागरे अनिल दयानंद<br>रा.घर नं.२२२५, सन–२८१/२, पाण्याच्या टाकीजवळ, बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री. जाधव आजिनाथ बाबाजी<br>राहणारः– उदरमल महादेव मंदिराजवळ, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्रीमती भिंगारदिवे मीनाबाई अशोक<br>राहणार– घर नं२९६, हरीजनवस्ती, चर्चजवळ, आगडगाव. ता/जि अहिल्यानगर | १,०४,०७५/- |
| १४ | २८०<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री ठोंबे नितिन प्रल्हाद<br>राहणार मु पो. खांडके ता/जि अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री. कदम लक्ष्मण छबु<br>राहणार– डॉन बॉस्को सोसायटी प्रेम सावेडी अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री अल्हाट सुभाष बन्सी<br>राहणार– चर्च जवळ पिंपळगाव उज्ञैनी ता./ जि.अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ ठोंबे शीतल नितीन<br>राहणारः लाईट डीपीजवळ, सैनिकनगर, महेशनगर रोड, भिंगार, अहिल्यानगर, | १,२०,२१७/- |
| १५ | २८२<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री– विधाते विवेक राजकुमार<br>राहणार : घनं, बबलू निवास २०८.झेडपी ऑफिससमोर, V- 11 स्ट्रेंथ जिमसमोर, माळीवाडा, अ. नगर<br>जाबदेणार २) श्री. घोरपडे राहुल दिलीप<br>राहणार घरनं. २८, माळीवाडा, शिवसंग्राम हॉटेलमागे, हरिजनवस्ती अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री– विधाते दिपक चंद्रकांत<br>राहणार– हरिजनवस्ती, माळीवाडा,अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) श्री. विधाते राजकुमार विठ्ठल<br>राहणार – घन२८, माळीवाडा, शिवसंग्राम हॉटेलमागे,हरिजनवस्ती, अहिल्यानगर | १,२४,९४६/- |
| १६ | २८३<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री वाघमारे अंकुश बाबासाहेब<br>राहणार शेळकेवस्ती, केकती शहापूर निंबोडी ता/जि अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री. अडागळे कानिफनाथ शंकर<br>रा–सर्वे नं २२५/३/४. प्लॉट नं ५०, सत्यभामा मंगलकार्यालयाजवळ भिंगार अ.नगर<br>जाबदेणार ३) श्री पिल्ले मयूर रवी<br>राहणार पर्मोटॉटन १२, जगदंबा अपार्टमेंट, ब्राह्मणगल्ली, भिंगार, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ. वाघमारे उर्मिला अंकुश<br>राहणार– शेळकेवस्ती केकती शहापूर निंबोडी अहिल्यानगर | १,१५,०७९/- |
| १७ | २८४<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री पाथरे विजय नाथा<br>रा. फोर्जिंग कंपनी, MIDC, नागापूर, विळद, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री–जरे जालिंदर जगन्नाथ<br>राहणार फोर्जिंग कंपनी, वडगाव गुप्ता MIDC. बायपास रोड, अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री घोरपडे पांडुरंग अशोक<br>राहणार– ८१/३. म्यु कॉलनी, गणपती मंदिरासमोर, अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ. पाधरे कौशल्या नाधा.<br>राहणार– फोर्जिंग कंपनी, MIDC नागापुर, विळद, अहिल्यानगर | १,९५,७६९/- |
| १८ | २८६<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री शिरसाठ विशाल फ्रान्सीस<br>राहणार मु डोंगरगण पो जेऊर ता/जि अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री–पंडित सुनील प्रकाश<br>राहणारः घर नं.५९८. विखेपाटील हायस्कूलसमोर, नविन मुकुंदनगर, फकीरवाडा अ.नगर<br>जाबदेणार ३) श्री ठोंबे अमोल रावसाहेब.<br>राहणार मु डोंगरगण, पो–जेऊर ता/जि–अहिल्यानगर<br>जाबदेणार ४) सौ शिरसाठ विमल क्रफ्रान्सीस<br>राहणार– मु–डोंगरगण पो. डोंगरगण ता/जि.अहिल्यानगर | १,१३,२६४/- |
| १९ | २८७<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) श्री पवार लुईस राजेंद्र.<br>जाबदेणार २) सौ– पवार शितल लुईस<br>दोघे राहणार–प्लॉटन ९, जगदंबा रेसिडेन्सी, दरेवाडी, अहिल्यानगर | २४,९१७/- |
| २० | २८८<br>--<br>२०२६ | जाबदेणार १)श्री– विधावे गणेश लक्ष्मण.<br>रा. लाईट डीपीजवळ, सैनिकनगर, महेशनगर रोड, भिंगार, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री. गाडे अशोक गुणाजी<br>राहणार : सैनिकनगर केतकी, जिल्हा परिषद शाळेजवळ, भिंगार,अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री गायकवाड संतोष नानासाहेब,<br>राहणार– बुरुडगावरोड अक्षय नर्सिंगहोमजवळ, भोसले आखाडा, अ.नगर<br>जाबदेणार ४) श्री.श्रीमती विधावे जयश्री गणेश<br>राहणारः– लाईट डीपीजवळ, सैनिकनगर, महेशनगर रोड, भिंगार, अहिल्यानगर. | ८५,१०६/- |
| २१ | २८९<br>--<br>२०२६ | जाबदेणार १) थोरात रघुनाथ आप्पासाहेब<br>राहणार प्लॉट नंबर ४२, मोरया पार्क, बोल्हेगाव, एमआयडीसी, अहिल्यानगर<br>जाबदेणार २) श्री रोहकले अजिनाथ तुकाराम.<br>राहणार– शिराढोण, नेवासकर पेट्रोल पंपाजवळ ता.जि/अहिल्यानगर<br>जाबदेणार ३) श्री. थोरात मिनीनाथ नामदेव<br>रा.– घर नंबर ६८६/०१ दत्त मंदिरामागे, कर्जुनरोड, निंबळक. ता.जि अहिल्यानगर.<br>जाबदेणार ४) सौ. थोरात नंदा रघुनाथ<br>राहणारः– लाईट डीपीजवळ, सैनिकनगर, महेशनगर रोड, भिंगार, अहिल्यानगर | १,०५,९४४/- |

ठिकाण : अहिल्यानगर
दि. २१/०१/२०२६

**(बाळकृष्ण शिंदे)**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा), अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन,अ.नगर**

# तुमचा मोबाईल अचानक वाजेल, व्हायब्रेट करेल; पण घाबरू नका

## ही आहे सेल ब्रॉडकास्ट अलर्टची चाचणी

नगर – आज तुमचा मोबाईल अचानक जोरजोरात वाजेल, व्हायब्रेट करेल, काही वेळासाठी मोबाईल स्क्रीन हँग झाल्याप्रमाणे होईल; पण घाबरू नका. ही सेल ब्रॉडकास्ट अलर्टची चाचणी आहे, जी एनडीएमएकडून देशभरात घेतली जात आहे. जागरूक राहा, सुरक्षित राहा आणि आमची तयारी, आमची सुरक्षा हे ब्रीदवाक्य घेऊन भारत सरकार ही चाचणी राबवत आहे.

भारत सरकारच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे (एनडीएमए) २ मे रोजी देशभरातील विविध क्षेत्रांमध्ये सेल ब्रॉडकास्ट अलर्ट प्रणालीची चाचणी घेण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना त्वरित सतर्क करण्यासाठी ही यंत्रणा विकसित करण्यात आली असून, तिची कार्यक्षमता तपासण्यासाठी हे परीक्षण केले जात आहे. नैसर्गिक आपत्ती किंवा इतर कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगी जास्तीत जास्त लोकांपर्यंत एकाच वेळी पोहोचण्यासाठी सेल ब्रॉडकास्ट अलर्ट ही अत्यंत प्रभावी यंत्रणा ठरणार आहे.

या चाचणीदरम्यान नागरिकांच्या मोबाईल फोनवर एक विशिष्ट संदेश आणि मोठ्या आवाजातील अलर्ट प्राप्त होईल. हा संदेश आपत्ती व्यवस्थापन प्रणालीचा एक भाग असून, नागरिकांना घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. हा संदेश मिळाल्यास कृपया घाबरून जाऊ नका. कोणतीही कृती आवश्यक नाही: हा संदेश तुमच्या मोबाईलवर आल्यास तुम्हाला त्यावर कोणतीही प्रतिक्रिया देण्याची किंवा कारवाई करण्याची गरज नाही. हे केवळ एक तांत्रिक परीक्षण असून, सध्या कोणताही वास्तविक धोका किंवा आणीबाणीची परिस्थिती नाही. नागरिकांनी शांत राहून सुरक्षित राहावे, असे आवाहन एनडीएमएकडून करण्यात आले आहे.

# प्रज्ञाशोध परीक्षेत ज्ञानसाधना गुरुकुलची दमदार कामगिरी


## स्वराज परांडे राज्यात १० वा, ओंकार चेमटे २८ वा आणि अदिराज कोतकर ३४ वा



नगर – केडगाव येथील ज्ञानसाधना गुरुकुलने यंदाही स्पर्धा परीक्षांमध्ये आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मंथन प्रज्ञाशोध, लक्षवेध प्रज्ञाशोध आणि सावित्रीबाई फुले प्रज्ञाशोध या विविध राज्यस्तरीय परीक्षांचे नुकतेच निकाल जाहीर झाले असून, या परीक्षेत गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळवले आहे.

यामध्ये स्वराज स्वप्नील परांडे या विद्यार्थ्याने तिन्ही परीक्षांमध्ये राज्यात १० वा क्रमांक मिळवत तालुक्यात प्रथम येण्याची उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच ओंकार चेमटे याने राज्यात २८ वा व जिल्ह्यात २१ वा क्रमांक पटकावला. अदिराज धीरज कोतकर याने राज्यात ३४ वा क्रमांक मिळवून केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळवला.

या तिन्ही विद्यार्थ्यांच्या यशातून ज्ञानसाधना गुरुकुलने गुणवत्तेचा ठसा पुन्हा एकदा उमटला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे आई–वडील, शाळेतील शिक्षक तसेच मार्गदर्शन करणाऱ्या क्लासमधील शबाना शेख, सुवर्णा दाणी, पूर्वा ढोरसकर, नक्षत्रा ढोरसकर तसेच प्रा. प्रसाद जमदाडे यांचे योगदान लाभले.


अहिल्यानगर सीए शाखेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जीएसटी परिषदेला शहरातील चार्टर्ड अकाउंटंट्स, विद्यार्थी तसेच माजी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली.

# सीए शाखेतर्फे आयोजित जीएसटी परिषद उत्साहात

नगर – अहिल्यानगर सीए शाखेतर्फे आयोजित करण्यात आलेली जीएसटी परिषद उत्साहात आणि उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडली. या परिषदेला शहरातील चार्टर्ड अकाउंटंट्स, विद्यार्थी तसेच माजी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी स्वागत करून परिषदेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. सध्याच्या कर व्यवस्थेतील बदलत्या परिस्थितिचा आढावा घेत त्यांनी जीएसटी हा केवळ कर प्रणालीतील बदल नसून देशाच्या आर्थिक शिस्तीचा आणि पारदर्शकतेचा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे नमूद केले. तसेच, व्यावसायिकांनी जीएसटीतील सातत्याने होणाऱ्या बदलांमध्ये प्रावीण्य मिळवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

परिषदेत विविध तज्ञ वक्त्यांनी मार्गदर्शन केले. सीसीएम सीए उमेश शर्मा यांनी जीएसटी मधील अलीकडील घडामोडी आणि जीएसटी ट्रिब्युनल प्रॅक्टिस कशी विकसित करावी या विषयावर सविस्तर विवेचन केले. तसेच त्यांनी बदलत्या कायदेशीर चौकटीत व्यावसायिकांनी कशा प्रकारे स्वतःला अद्ययावत ठेवावे या वर भर दिला.

यावेळी जीएसटी विभागाचे सहाय्यक आयुक्त दत्तात्रय भिसे उपस्थीत होते व त्यांनी या परिषदेसाठी सीए शाखेला शुभेच्छा दिल्या.

सीए विशाल पोद्दार यांनी फेक इनव्हॉइसिंग, आरसीएम आणि संबंधित प्रकरणांमधील लिटिगेशन हाताळण्याचे दृष्टिकोन यावर मार्गदर्शन करत प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित प्रभावी रणनीती मांडल्या. तसेच सीए व्यंकटेश अग्रवाल यांनी जीएसटी अंतर्गत अपील तयार करताना करावयाच्या आणि टाळावयाच्या बाबी या विषयावर भाष्य करत तथ्य शोधाचे महत्त्व, पुराव्यांची गरज आणि विविध अधिकारक्षेत्रांतील मुद्दे यावर त्यांनी विशेष प्रकाश टाकला. कार्यक्रमाला सीए व विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा, सीए सुशील जैन व सीए किरण भंडारी यांची उपस्थितीही विशेष उल्लेखनीय ठरली.

सूत्रसंचालन सीए काजल चंदे यांनी केले. सचिव सीए महेश भळगट यांनी आभार मानले. यावेळी शाखेचे उपाध्यक्ष सीए महेश तिवारी, माजी अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अहिल्यानगर सीए शाखेचे कमिटी सदस्य तसेच सीए सागर रोहिडा, सीए सचिन लोखंडे व सीए अस्लम शेख व जीएसटी कमिटीतील इतर सभासदांनी परिश्रम घेतले.

# 'ग्रीन सिटी' सारख्या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाची व्यापक लोकचळवळ उभारणे काळाची गरज : पालकमंत्री

**वर्षभरात एक लाख वृक्ष लागवड व संवर्धनाचा संकल्प; 'क्लीन अँड ग्रीन' अहिल्यानगर घडविण्याचा निर्धार**







साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेचा शुभारंभ शहरातील माऊली सभागृह येथे उत्साहात पार पडला. (छाया : लहू दळवी)

नगर – शहरांचा झपाट्याने होणारा विस्तार, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, वाहनांची प्रचंड वाढ आणि बदलती जीवनशैली यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडत असून प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. या वाढत्या प्रदूषणाचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून विविध आजारांचे प्रमाणही वाढत असल्याचे वैद्यकीय अहवालांतून स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर 'ग्रीन सिटी'सारख्या उपक्रमांद्वारे पर्यावरण संवर्धनाची व्यापक आणि सातत्यपूर्ण लोकचळवळ उभारणे अत्यंत आवश्यक असून उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी राबवण्याचा हाती घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेचा भव्य शुभारंभ शहरातील माऊली सभागृह येथे उत्साहात पार पडला. या मोहिम अंतर्गत पुढील एका वर्षात शहरात एक लाख वृक्ष लागवड व त्यांच्या संगोपनाचा संकल्प करण्यात आला आहे. या उपक्रमाचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर अॅड. धनंजय जाधव, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नितीन दिनकर, विनायकराव देशमुख, राजाभाऊ मुळे, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप, शहराध्यक्ष अनिल मोहिते, माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांच्यासह, नगरसेवक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, प्रदूषण ही केवळ पर्यावरणाची नव्हे तर मानवी आरोग्याची गंभीर समस्या बनली आहे. दिल्ली, मुंबई, पुणे यांसारख्या शहरांमध्ये प्रदूषणाने धोकादायक पातळी गाठली आहे. अहिल्यानगरने वेळेत योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यात गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यांनी मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाची होत असलेली हानी अधोरेखित करत वृक्षलागवड ही केवळ औपचारिकता न राहता तिचे संगोपन व संवर्धन अधिक महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, शहराचा विकास करताना पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. केवळ रस्ते, इमारती व पायाभूत सुविधा उभारणे म्हणजे विकास नव्हे, तर हरित क्षेत्र वाढविणे, जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि प्रदूषण नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना करणे ही खरी विकासाची दिशा आहे. प्रत्येक प्रभागात 'ग्रीन स्पेस' निर्माण करून नागरिकांना शुद्ध हवा आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून उपमहापौर जाधव यांच्या ग्रीन सिटीच्या प्रयत्नांना नगरकरांनी साथ देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

सीना नदीच्या प्रदूषणाचा विशेष उल्लेख करत त्यांनी सांगितले की, सांडपाणी व अतिक्रमणामुळे सीना नदीची अवस्था अत्यंत चिंताजनक झाली आहे. नदी गटारात रूपांतरित होण्याच्या मार्गावर असून भविष्यात धरणांनाही प्रदूषणाचा धोका निर्माण होऊ शकतो. यावर उपाय म्हणून सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नदी स्वच्छता मोहिमा आणि अतिक्रमण निर्मूलन यांसारख्या उपाययोजना राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील जलसंपदा विभागाची सुमारे ५६ हजार एकर जमीन अतिक्रमणमुक्त करण्यात आली असून त्यावर महाराष्ट्र शासनाचे नाव लावण्यात आले आहे. जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी विविध प्रकल्प राबविले जात असल्याची माहितीही त्यांनी दिली. पर्यावरण विषयक लोकशिक्षणाची चळवळ उभारणे, शाळा–महाविद्यालयांमधून जनजागृती करणे आणि नागरिकांना पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्यास प्रोत्साहित करणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

आमदार संग्राम जगताप यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, वृक्षारोपणाबरोबरच त्याचे संवर्धन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्याच्या वाढत्या तापमानाची सर्वजण चर्चा करतात मात्र त्यावर उपाय योजना करण्यासाठी प्रत्यक्षात काम करण्याची वेळ आलेली आहे. लोकसहभागाशिवाय ही मोहीम यशस्वी होऊ शकत नाही. अनेकदा वृक्षारोपण केले जाते; मात्र त्याची निगा राखली जात नाही. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने सहभाग घेतल्यास 'ग्रीन सिटी'चे स्वप्न साकार होईल. उपमहापौर धनंजय जाधव यांनी सुरू केलेल्या ग्रीन सिटी उपक्रमामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपापली सामाजिक जबाबदारी पार पाडावी असे आवाहन आ. जगताप यांनी यावेळी केले.

उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांनी प्रास्ताविकात मोहिमेची सविस्तर माहिती देताना सांगितले की, शहरातील सर्व १७ प्रभागांमध्ये नगरसेवक व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने भारतीय प्रजातींची सुमारे १० फूट उंचीची झाडे लावण्यात येणार आहेत. मोठी रोपे लावल्यामुळे त्यांचे संगोपन व संवर्धन सुलभ होणार असून झाडे जगण्याचे प्रमाण देखील वाढणार आहे. मे महिन्यामध्ये वृक्षारोपणाची पूर्वतयारी करण्यात येईल व त्यानंतर जून महिन्यामध्ये पहिला पाऊस झाल्यानंतर प्रत्यक्ष रोपांची लागवड करण्यात येईल. वृक्षलागवडीनंतर त्यांच्या संगोपनासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात येणार असून प्रभागनिहाय स्पर्धांचे आयोजन करून नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यात येणार आहे. ग्रीन सिटी ही केवळ योजना नसून ती जनआंदोलन बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या वृक्ष लागवड मोहिमेनंतर सामाजिक बांधिलकी जपत दिवंगत आ. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ मोफत महाआरोग्य तपासणी मोहीम राबविण्यात येणार असल्याची घोषणा उपमहापौर ड धनंजय जाधव यांनी केली. पहिल्या टप्प्यात सुमारे दोन लाख नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात येणार असून त्यामध्ये मोफत रक्त तपासणीचा समावेश असेल. महानगरपालिकेमार्फत उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे.

कार्यक्रमादरम्यान मोहिमेत सहभागी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींचा पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थितांना पर्यावरण संवर्धनासाठी वैयक्तिक व सामूहिक पातळीवर योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास बाळासाहेब पवार, अशोक गायकवाड, मनोज कोतकर, निखिल वारे, सुरेश बनसोडे, पुष्पाताई बोरुडे, शारदाताई ढवण, गीतांजली काळे, रवींद्र बारस्कर, सतीश शिंदे, जालिंदर कोतकर, महेश लोंढे, दत्ता गाडळकर, अनिल ढवण, मनोज लोंढे, विजय पठारे, करण कराळे, वैभव सुरवसे, राजेंद्र पवार, प्रताप काळे, बाली बांगरे रोशनी त्रिंबके, सुजाता पडोळे यांसह विविध पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

या मोहिमेत तिरंगा फाउंडेशन, निरंजन सेवाभावी संस्था, गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान – घर घर लंगर सेवा, जैन ओसवाल युवक संघ – जॉईज, जाणीव फाउंडेशन, सी ए इंडिया, श्री बडीसाजन ओसवाल युवक संघ, हरिभूमी प्रतिष्ठान, हरियाली संस्था यांसह अनेक सेवाभावी संस्था व वृक्षप्रेमी सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. नगरसेवक निखिल वारे यांनी आभार मानले.



पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते स्वगणना करीत अहिल्यानगर जिल्हा जनगणनेचा शुभारंभ करण्यात आला.

## ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते स्वगणना करीत जिल्हा जनगणनेचा शुभारंभ

नगर – राष्ट्रीय जनगणनेला आजपासून महाराष्ट्रात सुरुवात झाली असून जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वगणना करीत अहिल्यानगर जिल्ह्यातील जनगणनेचा शुभारंभ केला. या जनगणनेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन पालकमंत्र्यांनी केले.

पोलीस कवायत मैदान येथे १ मे महाराष्ट दिनाच्या व कामगार दिनाच्या शासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर स्वगणनेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्र्यांनी टॅबवर स्वतःच्या घरगणनेसंबंधी असणाऱ्या सर्व ३४ प्रश्नांची उत्तरे भरली. स्वतःच्या घराची माहिती भरून 'सबमिट' बटनावर क्लिक केल्यावर त्यांचा 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' तयार झाला. अशा पद्धतीने स्वतःच स्वतःची माहिती भरून पालकमंत्री महोदयांनी जिल्ह्यातील जनतेला स्वगणना करण्याचे आवाहन देखील केले.

१ ते १५ मे हा स्वगणनेचा कालावधी असून त्यानंतर १६ मे ते १४ जून या कालावधीत घरोघरी जाऊन प्रगणकांमार्फत जनगणना केली जाणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते व इतर अधिकाऱ्यांनीही आपली स्वगणना पूर्ण केली. तसेच, या जनगणना मोहिमेत नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले.



स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा समाजकार्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

## महाराष्ट्र, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी

नगर – हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने छावणी परिषदेतील कामगारांचा सत्कार करून त्यांच्या श्रमाचे कौतुक करण्यात आले, तसेच भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पवृष्टी करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उद्यान परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्यानंतर बुद्धांच्या पुतळ्यासमोर मेणबत्त्या प्रज्वलित करून त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले आणि सुख, शांती व समृद्धीसाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. या कार्यक्रमास छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी डॉ. दमन काशीद, हरदिन ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, सर्वेश व प्रांजली सपकाळ, संगीता सपकाळ, जहीर सय्यद, जैद सय्यद, जियान सय्यद, सोपानराव साळवे, सचिन परदेशी यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमात ईवान सपकाळ यांच्या हस्ते बोधीवृक्षाचे प्रतीक म्हणून पिंपळाच्या झाडांची लागवड करण्यात आली. तसेच संजय भिंगारदिवे, दीपक अमृत आणि रमेश भिंगारदिवे यांनी त्रिशरण व पंचशील घेतले.

## अहिल्यानगर ग्रीन सिटी उपक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल सकल माळी समाजातर्फे उपमहापौर धनंजय जाधव यांचा सन्मान



'अहिल्यानगर ग्रीन सिटी' या उपक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल उपमहापौर धनंजय जाधव यांचा सकल माळी समाजाच्या वतीने उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांच्या हस्ते सत्कार करून सन्मान करण्यात आला.

नगर – अहिल्यानगर शहरात राबविण्यात येत असलेल्या 'अहिल्यानगर ग्रीन सिटी' या उपक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल उपमहापौर धनंजय जाधव यांचा सकल माळी समाजाच्या वतीने उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांच्या हस्ते सत्कार करून सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास ओबीसी नेते रामदास फुले, सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, विश्वस्त विनोद पुंड, कोर कमिटी सदस्य अमोल भांबरकर, अनिल इवळे, संताजी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन हरिभाऊ डोळसे, गायत्री परिवाराचे प्रमुख काशिनाथ मोडे, रोहित पठारे, चंद्रकांत पुंड, कॅप्टन सुधीर पुंड उपस्थित होते.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राखणे ही आजची अत्यंत गरज बनली आहे. वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाहनांची वाढती संख्या यामुळे प्रदूषणाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. हरित क्षेत्रे कमी होत असल्याने वातावरणातील समतोल ढासळत चालला आहे. अशा परिस्थितीत 'ग्रीन सिटी' सारखे उपक्रम केवळ आवश्यकच नाहीत, तर ते भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात. प्रत्येक नागरिकाने आपल्या स्तरावर पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण संवर्धनासाठी समाजाने पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन बाळासाहेब भुजबळ यांनी केले.

ते पुढे म्हणाले, पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर ती समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आपण प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन केले, तर शहराचे रूप पालटू शकते. युवकांनी विशेषतः पुढे येऊन या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे काम केल्यास आपण येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ, सुंदर आणि निरोगी वातावरण निर्माण करू शकतो, असा विश्वास मला वाटतो.

रामदास फुले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अहिल्यानगर ग्रीन सिटी हा केवळ एक उपक्रम नसून तो सामाजिक परिवर्तनाची सुरुवात आहे. या माध्यमातून नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण होत आहे आणि सकारात्मक बदल दिसून येत आहेत. शहराच्या विकासासोबत पर्यावरणाचे रक्षण करणे ही मोठी जबाबदारी आहे. अशा उपक्रमांना सर्व समाजघटकांनी पाठबळ देऊन त्यात सक्रिय सहभाग नोंदविणे अत्यंत आवश्यक आहे.

धनंजय जाधव म्हणाले, माळी समाजाच्या वतीने झालेला हा सत्कार माझ्यासाठी प्रेरणादायी आणि जबाबदारी वाढवणारा आहे. 'ग्रीन सिटी' उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही शहर अधिक हरित आणि स्वच्छ करण्यासाठी विविध योजना राबवत आहोत. नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि सहकार्य मिळाल्यास हे उद्दिष्ट निश्चितपणे साध्य होईल. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने पुढे येऊन योगदान देणे हीच खरी गरज आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचा गौरव करण्यात आला तसेच पर्यावरण संवर्धनासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## बुद्ध पौर्णिमेनिमित्त ५ दिवसीय 'धम्मसंस्कार' शिबिर उत्साहात



नगर – बुद्ध पौर्णिमा तथा वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने बौद्ध संस्कार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले ५ दिवसीय 'धम्मसंस्कार' शिबिर उत्साहात झाले. उन्हाळी सुट्टीचे औचित्य साधून २५ ते ३० मे या कालावधीत दररोज सायंकाळी दोन तास या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अहिल्यानगर शहरातील सखी बौद्ध महिला मंच (प्रबुद्धनगर, कल्याण रोड), रमाई महिला मंडळ (भिंगार), बौद्ध ज्येष्ठ महिला मंडळ (उपनगर सावेडी) तसेच उपासक–उपासिका (निर्मलनगर, तपोवन रोड) येथील एकूण ३७ जणांनी सहभाग नोंदविला.

धम्म प्रशिक्षक भाऊसाहेब देठे यांनी शिबिरामध्ये 'द बुद्ध आणि त्याचा धम्म' या महत्त्वपूर्ण ग्रंथाच्या सखोल अभ्यासावर भर देण्यात आला. ग्रंथाचे महत्त्व, वाचन करण्याचा परिपाठ, शब्दार्थांसह चर्चा व स्पष्टीकरण यांद्वारे सहभागींचे प्रबोधन करण्यात आले. बुद्धांचा धम्म हा केवळ धार्मिक विचार नसून एक शोध आणि सामाजिक संदेश असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. माणसाने माणसासाठी शोधून काढलेला धम्म म्हणून बुद्धांच्या विचारांची मांडणी करण्यात आली.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवनभर अथक परिश्रम घेत, दिवसाचे १८ ते २० तास अभ्यास करून अत्यंत जबाबदारीने 'द बुद्ध आणि त्याचा धम्म' हा ग्रंथ लेखन पूर्ण केला. बौद्धांचा एकमेव आदर्श ग्रंथ म्हणून या ग्रंथाला योग्य तो सन्मान मिळावा, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

हा ग्रंथ केवळ भारतातील बौद्धांसाठी नसून जगभरातील–अमेरिका, इंग्लंड, जपान, थायलंड, श्रीलंका, म्यानमार, कोरिया, नेपाळ, व्हिएतनाम आदी देशांतील बौद्धांसाठी मार्गदर्शक आहे. प्रत्येक बौद्ध व्यक्ती व कुटुंबाने हा ग्रंथ समजून घेऊन त्याचा अभ्यास करावा आणि त्यानुसार इतरांना मार्गदर्शन करावे, असे आवाहन करण्यात आले.

बौद्ध संस्कार संघ गेल्या वीस वर्षांपासून बुद्ध पौर्णिमेनिमित्त दरवर्षी अशा प्रकारचे ५ दिवसीय संस्कार शिबिर आयोजित करत असून या उपक्रमात अभ्यासक व उपासक सहभागी होऊन लाभ घेत आहेत. यंदाही शिबिरास प्रतिसाद मिळाला असून सहभागींकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

## आनंदधाम येथे 'आनंद संस्कार शिबिराला' प्रतिसाद



नगर – राष्ट्रसंत आचार्य सम्राट गुरुदेव आनंदऋषीजी महाराजांच्या आशीर्वादाने आणि प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषीजी महाराजांच्या मार्गदर्शन व प्रेरणेने, सौ. सरोज कटारिया यांच्या नेतृत्वाखाली 'आनंद संस्कार शिक्षा अभियान' अंतर्गत आनंद संस्कार शिबिराचे आयोजन दरवर्षीप्रमाणे १ मे पासून आनंदधाम येथे करण्यात आले आहे.

या शिबिराला ६०० मुलामुलींचा प्रतिसाद लाभला असून आनंदधामचे प्रांगण सकाळी ७ वाजल्यापासून मुलांच्या किलबिलाटाने चैतन्यमय होत आहे. साध्वी विपुलदर्शनाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली प्रार्थना व मेडिटेशन सत्राने शिबिराची सुरुवात होते. सुप्रिया छल्लाणी मुलांचे आरोग्य तपासणी व व्यायामाचे वर्ग घेत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने स्क्रीनद्वारे मुलांना जैन धर्माचा इतिहास, ऐतिहासिक कथा व नैतिक मूल्यांचे शिक्षण दिले जात आहे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी विविध माईंड गेम्स व उपक्रम राबवले जात आहेत. अतिथी भवन येथे सकाळचा पौष्टिक नाश्ता दिला जातो. सहभोजनातून मुलं सहजीवन, शिस्त व समतेचे धडे गिरवत आहेत. दररोज शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी महाराजांचे अनमोल मार्गदर्शन लाभत आहे. तसेच अनेक साध्वीजींचेही मार्गदर्शन मिळत आहे. दररोज शेवटी मुलांना खाऊ वाटप केले जाते.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी यासाठी दरवर्षी आनंद संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात येते. आजकाल मुलांवर सोशल मिडिया, इंटरनेट, टिव्ही स्क्रीनचा प्रभाव वाढला आहे. अशा वेळी मुलांना आध्यात्मिक ज्ञान देतानाच त्यांना आपल्या संस्कृतीची ओळख व्हावी यासाठी शिबिरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामुळेच शिबिरार्थींमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आनंद संस्कार शिक्षा अभियानाची संपूर्ण टीम तसेच ब्राह्मी युवती मंचच्या युवती परिश्रम घेत आहेत.

# ‘डिफेन्स क्लस्टर’ च्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्याचा वेगवान विकास

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन, महाराष्ट्र दिन उत्साहात

नगर – अहिल्यानगर जिल्हा आता ’डिफेन्स क्लस्टर’च्या माध्यमातून वेगाने विकसित होत असून, जिल्ह्यात नौदलाच्या संदर्भातील ’डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग’ प्रकल्प उभा राहत आहे. संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते लवकरच या प्रकल्पाचे उद्घाटन होणार असून, यामुळे जिल्ह्यातील युवकांना स्थानिक पातळीवरच मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या कुटुंबाला स्थैर्य मिळेल, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त अहिल्यानगर येथील पोलीस कवायत मैदानावर डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त अहिल्यानगर येथील पोलीस कवायत मैदानावर डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महापौर ज्योती गाडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, १ मे १९६० रोजी आपल्या राज्याच्या निर्मितीसाठी ज्या हुतात्म्यांनी बलिदान दिले, त्यांच्या प्रति राज्य शासन कृतज्ञ आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन राज्याची प्रगतीची घोडदौड सुरू आहे. आज कामगार दिन असून सर्व कष्टकरी बांधवांच्या योगदानाचाही त्यांनी गौरव केला.

२०२७ ची जनगणना ही स्वातंत्र्योत्तर पहिलीच ’डिजिटल’ जनगणना असून नागरिकांनी ’स्वगणना’ सुविधेचा लाभ घेऊन आपली अचूक माहिती नोंदवावी. ही प्रक्रिया देशाच्या विकासाची पुढील दिशा ठरवणारी असेल. तसेच ’डिजिटल इंडिया’ संकल्पनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राज्याच्या विकासाचा आराखडा मांडताना डॉ. विखे पाटील यांनी ’विकसित महाराष्ट्र’ या संकल्पनेवर भर दिला. ते म्हणाले, २०४७ च्या विकसित भारताच्या संकल्पासोबतच ’विकसित महाराष्ट्र’ घडवणे हे आमचे ध्येय आहे. राज्याची अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डॉलरपर्यंत नेऊन देशाला विकासाची दिशा देणारे महाराष्ट्र हे देशामध्ये प्रथम क्रमांकाचे राज्य ठरेल. यासोबतच आरोग्य सुविधा आणि कौशल्य विकासामध्येही आपला जिल्हा उल्लेखनीय कामगिरी करत असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरण व जलसंवर्धनाचा उल्लेख करताना त्यांनी ’गोदा ते नर्मदा दर्शन जलयात्रा’ उपक्रमाची माहिती दिली. हजारो महिलांच्या सहभागातून गोदावरीच्या पवित्र जलाचे व मातीचे पूजन करून पाणी बचतीचा आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी, सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देत त्यांनी विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

मुख्य ध्वजारोहणाच्या या सोहळ्यास स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी–कर्मचारी, पत्रकार, नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.

# ब्राह्मण सेवा संघ, केडगावतर्फे ३ मे रोजी वेदांत कुलकर्णी यांचा सत्कार व मिरवणुक



नगर – वैदिक परंपरेतील अत्यंत कठीण समजली जाणारी ऋग्वेद कंठस्थ परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण करून वेदांत बाळकृष्ण कुलकर्णी (पंढरपूरकर) यांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. या यशाबद्दल ब्राह्मण सेवा संघ, केडगाव यांच्या वतीने त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला असून, हा सोहळा ३ मे रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालय येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

ऋग्वेद कंठस्थ परीक्षा ही अत्यंत कठोर आणि शिस्तबद्ध अभ्यासाची मागणी करणारी परीक्षा मानली जाते. आयुष्यात केवळ दोनदाच ही परीक्षा देता येते. या परीक्षेसाठी सुमारे १०,५५२ मंत्रांचे एकूण १ लाख ५० हजार पदे सस्वर, कंठस्थ आणि बिनचूक पद्धतीने म्हणणे आवश्यक असते. अशा कठीण निकषांवर यश मिळवणे हे मोठे अभिमानास्पद यश मानले जाते. वेदांत कुलकर्णी यांनी ही परीक्षा उत्तीर्ण करून वैदिक अध्ययनातील आपली प्रावीण्य सिद्ध केले आहे.

या यशाबद्दल ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष नंदकुमार पोळ यांनी माहिती देताना सांगितले की, वेदांत कुलकर्णी यांचा सत्कार हा केवळ व्यक्तिगत गौरव नसून संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. पारंपरिक वेदाध्ययनाची परंपरा पुढे नेणाऱ्या तरुणांचा गौरव करणे ही काळाची गरज असून, अशा उपक्रमांमुळे नवीन पिढीला प्रोत्साहन मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने केडगाव परिसरात मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या मिरवणुकीत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असणार असून, नागरिकांना एक वेगळा आध्यात्मिक अनुभव मिळणार आहे. या सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, याच दिवशी ब्राह्मण सेवा संघाच्या वतीने २३ बटुंचे सामुदायिक उपनयन (मुंजी) सोहळ्याचेही आयोजन करण्यात आले आहे. समाजातील विविध कुटुंबांना एकत्र आणणारा हा उपक्रम असून, पारंपरिक संस्कार जपण्याचा एक प्रयत्न आहे. त्यामुळे ३ मे रोजी केडगाव येथे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी लाभणार असून, नागरिकांनी उपस्थित राहावे.

# अहिल्यानगरच्या रंगभूमीवर ४ मे रोजी ‘निमल’चा थरार

## प्रमुख भूमिका असलेल्या सिद्धार्थ जाधवचा अभिनय पाहण्याची संधी




नगर – शहरातील नाट्यप्रेमींसाठी एक खास पर्वणी ठरणार असून कबीर इव्हेंट्सच्या वतीने ४ मे रोजी रात्री ८:३० वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात ‘निमल’ या बहुचर्चित मराठी नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे.

अश्वमी थिएटर्स निर्मित या नाटकात प्रमुख भूमिका साकारणारे सिद्धार्थ जाधव हेच निर्माते असून, नाटकाचे लेखन व दिग्दर्शन महेश मांजरेकर यांनी केले आहे. ‘निमल’ हे नाटक एका गावातून मुंबईत अभिनेता होण्याचे स्वप्न घेऊन आलेल्या ‘दत्तू’च्या संघर्षमय प्रवासाची कथा मांडते. या नाट्यातून त्याच्या भावविश्वातील निरागसता, स्वप्नं, अपयश आणि वास्तवाचा सामना प्रभावीपणे उलगडतो. मराठी रंगभूमीवरील एकपात्री परंपरेला नवा आयाम देणारे हे नाटक प्रेक्षकांना वेगळा अनुभव देणारे ठरणार आहे. नाटकात केवळ संवादच नव्हे, तर नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत आणि मूक पात्रांच्या माध्यमातून कथानक अधिक जिवंत करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, ‘दत्तू’च्या भूमिकेत सिद्धार्थ जाधव यांचा अभिनय प्रेक्षकांना थेट मनाला भिडणारा ठरतो. त्याच्या स्वप्नांचा प्रवास, त्यातील चढ–उतार आणि शेवटचा भावनिक टप्पा प्रेक्षकांना अंतर्मुख करणारा आहे. या नाटकाच्या माध्यमातून ‘स्ट्रगलर’च्या जीवनातील वास्तव, संघर्ष आणि अपूर्ण स्वप्नांची वेदना अधोरेखित केली जाते. त्यामुळेच हे नाटक केवळ मनोरंजन न राहता एक विचार करायला भाग पाडणारा अनुभव ठरतो.

नाट्यप्रेमींनी या अनोख्या रंगमंचीय प्रयोगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. तिकीट रविवारी व सोमवारी दिवसभर सभागृहात उपलब्ध असणार आहे. तसेच ९८५०१९२३४५ या मोबाईलवर संपर्क करुन बुकिंग करता येणार आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी खास दुसरे बालपण स्पर्धेचा प्रवेश अर्ज भरण्यासाठी ४ मे अंतिम तारीख




नगर – येथील डॉ. कांकरिया यांच्या मानकन्हैया ट्रस्टच्या वतीने आयोजित जेष्ठ नागरिकांसाठी खास दुसरे बालपण स्पर्धेची तयारी उत्तम रीतीने चालू असून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून त्याला प्रतिसाद प्राप्त होत आहे. या स्पर्धेत वय वर्ष ५० च्या पुढील सर्व व्यक्ती सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धा २० मे रोजी माऊली सभागृह येथे होणार असून त्यासाठी प्रवेश अर्ज मात्र ४ मे पर्यंत सादर करायाचे आहेत. अशी माहिती कार्याध्यक्ष डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली. संयोजन समितीची बैठक नुकतीच पार पडली. त्यात पी डी कुलकर्णी, चंद्रकांत पालवे, सदाशिव मोहिते, नंदकुमार देशपांडे, प्रशांत कटके, जयंत येलूलकर, प्रसाद बेडेकर, चंद्रकांत पंडित, प्रिया सोनटक्के, रामदास केदार, दिपक शिरसुल हे सहभागी झाले होते. बैठकीमध्ये स्पर्धेची नियमावली तसेच स्पर्धेचे वेगळेपण याविषयीची चर्चा झाली. ज्येष्ठ नागरिकांमध्ये दुसरे बालपण अधिक मार्मिकपणे फुलविण्याविषयी चिंतन करण्यात आले. विवाह सोहळा एक उत्सव या विषयाला धरून यंदाच्या स्पर्धा होणार असून प्रवेश अर्ज ४ मे पर्यंत साई सूर्य नेत्रसेवा, माणिक चौक, अहिल्यानगर येथे पोहोचवायचा आहे. त्यासाठी ९८५०८८७८३८ येथे संपर्क करायचा आहे. अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया यांनी दिली. सदर सभेमध्ये जयंत येलुलकर, शाम शिंदे, आदिनाथ अन्नदाते या कलावंतांचा सन्मान करण्यात आला.

# पोलीस हवालदार राजू सुद्रिक यांचा पोलीस अधिक्षकांच्या हस्ते सन्मान

नगर – राज्यातील पोलीस दलात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि अंमलदारांना दिला जाणारा प्रतिष्ठेचा ’पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह’ पुरस्कार अहिल्यानगर पोलीस दलातील पोलीस हवालदार राजू आप्पासाहेब सुद्रिक यांना जाहीर झाला आहे.त्यांच्या या यशाबद्दल महाराष्ट्र दिनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी त्यांचा सन्मान केला.



पोलिस महासंचालक पदक जाहीर झाल्याबद्दल पोलिस हवालदार राजू सुद्रिक यांचा महाराष्ट्रदिनी सन्मान करताना पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, समवेत अप्पर पोलिस अधिक्षक वैभव कलुबर्मे.

महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सन २०२५ या वर्षासाठीचे सन्मानचिन्ह नुकतेच घोषित करण्यात आले.यामध्ये राज्यभरातील ८०० पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश आहे. राजू सुद्रिक यांनी अहिल्यानगर पोलीस दलात कार्यरत असताना गेल्या सतत १५ वर्षांपासून अत्यंत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्यांचा उल्लेखनीय सेवा अभिलेख, उत्तम प्रशासकीय कार्यक्षमता आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा लक्षात घेऊन त्यांना या सन्मानाने गौरविण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्राद्वारे सुद्रिक यांचे कौतुक करताना म्हटले की, आपल्या या उत्तम कामगिरीबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन.भविष्यात आपण अशीच उल्लेखनीय कामगिरी पार पाडाल, अशी मला आशा आहे. सध्या राजू सुद्रिक हे एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत आहेत.






महाराष्ट्र दिन व कामगार सप्ताहाच्या निमित्ताने

# ‘आय लेझर’तर्फे ५ ते १५ मे दरम्यान विशेष नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – अहमदनगर आय लेझर, अहिल्यानगर यांच्या वतीने विशेष नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये स्पर्श न करता करण्यात येणाऱ्या प्रगत पृष्ठभागीय शस्त्रक्रिया, व्यक्तिनिहाय अचूक मार्गदर्शित लेझर उपचार तसेच कॉर्नियावरील डागांसाठी आधुनिक उपचार पद्धतींची तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. या सर्व प्रक्रिया वेदनारहित, विना चीर (कट) आणि सुरक्षित असून आतापर्यंत ३५० हून अधिक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्याची माहिती नेत्रतज्ज्ञांनी दिली.

शिबिराच्या निमित्ताने ५ ते १५ मे या कालावधीत समर स्पेशल अंतर्गत सर्व दृष्टीदोष दुरुस्ती प्रक्रियांवर ३० टक्के सवलत देण्यात येणार आहे. यासोबतच डोळ्यांच्या पटलाचा सखोल नकाशा तयार करून अचूक निदानाची सुविधा उपलब्ध राहणार आहे. रुग्णांच्या सोयीसाठी रोखरहित उपचार, खर्च परतावा योजना तसेच हप्त्यांमध्ये देयक भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शिबिरात चष्म्याचा नंबर, डोळ्यांची स्थिती व विविध नेत्रदोषांची सविस्तर तपासणी करून तज्ज्ञांकडून योग्य उपचारांचा सल्ला दिला जाणार आहे.

चष्म्यापासून कायमस्वरूपी मुक्त होण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी अहमदनगर आय लेझर, अहिल्यानगर येथील नेत्र केंद्राशी संपर्क साधावा. संपर्क क्रमांक – ९१४६११२०५९, ९७६६९२३२३७.

# पोलीस उपनिरीक्षक पदी सचिन वाघचौरे



नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या मर्यादित विभागीय पोलीस उपनिरीक्षक परीक्षा २०२३ चा निवड निकाल ३० एप्रिल रोजी जाहीर झाला आहे. या परीक्षेत नगर तालुक्यातील बारादरी येथील पुत्र सचिन बबन वाघचौरे यांने घवघवीत यश संपादन करत पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे. त्याने ४०० पैकी ३६३ गुण मिळवून सर्वसाधारण गुणवत्ता यादीत १२३ वा क्रमांक पटकावला आहे.

शेतकरी व कष्टकरी मुलाची गरुडझेप – सचिन याचे आई–वडील शेतीमध्ये कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी मुलाच्या शिक्षणासाठी जिवापाड मेहनत घेतली. सचिन चे प्राथमिक शिक्षण बारादरी येथील आश्रम शाळेत झाले तर पुढील उच्च शिक्षण त्यांनी अहिल्यानगर येथे महाविद्यालयात पूर्ण केले. आई–वडिलांच्या कष्टाचे चीज करत सचिन ने आज हे मोठे यश मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

‘खाकी’तील प्रवास – सचिन वाघचौरे याची २०११ मध्ये मुंबई पोलिस दलात निवड झाली होती. पोलीस दलात सेवा बजावत असतानाच त्याने वरिष्ठ पदावर जाण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. कर्तव्यावर असतानाही अभ्यासातील सातत्य आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्याने एमपीएससीची ही विभागीय परीक्षा दिली. ६१५ जागांसाठी झालेल्या या अत्यंत चुरशीच्या परीक्षेत त्याने आपल्या जिद्दीच्या जोरावर पीएसआय पदापर्यंत मजल मारली आहे.

# जुन्या महापालिकेत २० वर्षांनंतर ध्वजारोहण; महाराष्ट्र – कामगार दिन उत्साहात साजरा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक दोन तसेच जुन्या महापालिका परिसरात महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. या कार्यक्रमात उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विशेष म्हणजे, जुन्या महापालिकेत तब्बल २० वर्षांनंतर ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडल्याने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.



महापालिकेत ध्वजारोहणप्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव आदी. (छाया : लहू दळवी)

याच वेळी स्व–जनगणनेचा शुभारंभ उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी उपायुक्त शहनवाज तडवी, प्रभाग अधिकारी अजीम शेख, जनगणना अधिकारी राकेश कोतकर, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, नितीन इंगळे, सुबोध देशमुख, विकास गीते आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले, जुन्या महापालिकेत वीस वर्षांनंतर ध्वजारोहणाचा कार्यक्रम होत असल्याचा मला विशेष आनंद आहे. शहराच्या या ऐतिहासिक वास्तूचे जतन होणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा. कामगार हा देशाच्या जडणघडणीतील महत्त्वाचा घटक असून त्यांच्या योगदानामुळेच देशाची प्रगती शक्य होते. १ मे ते १५ मे या कालावधीत स्व–जनगणना सुरू असून नागरिकांनी आपल्या मोबाईलवरील पोर्टलद्वारे नोंदणी करावी. त्यानंतर १६ मे ते १४ जून दरम्यान घरोघरी जाऊन जनगणना करण्यात येणार आहे. ही जनगणना देशाच्या विकासाची दिशा आणि भविष्यातील वाटचाल निश्चित करणारी ठरणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# ‘एमबीबीएस’मध्ये डॉ. दर्शना गुंदेचा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



श्रीरामपूर – येथील डॉ. दर्शना गुंदेचा ही सुमनदीप विद्यापीठ वडोदरा येथील एसबीकेएस वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस ही वैद्यकीय परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे.

दर्शना गुंदेचा ही सचिन एजन्सी व रमेश बुक स्टॉलचे संचालक सचिन रमेश गुंदेचा व सौ. रुपाली सचिन गुंदेचा यांची पुतणी तसेच अमोल रमेश गुंदेचा व सौ. अर्चना अमोल गुंदेचा यांची कन्या, जैन समाजातील ज्येष्ठ मार्गदर्शक व होलसेल पुस्तक विक्रेते रमेश रतनचंद गुंदेचा व सौ. अलका रमेश गुंदेचा यांची नात आहे. डॉ.दर्शना गुंदेचा हिचे प्राथमिक शिक्षण भि.रा. खटोड कन्या विद्यालय श्रीरामपूर येथे व व महाविद्यालयीन शिक्षण रामराव आदिक पब्लिक स्कूल निपाणी वडगाव येथे झाले. त्यानंतर एमबीबीएस वैद्यकीय शिक्षण एसबीकेएस वैद्यकीय महाविद्यालय वडोदरा (गुजरात) येथे पूर्ण झाले.



कोठुनी आणावी आपली दिव्यमुर्ती
पुनर्जन्म घेतील का आमच्यासाठी
आठवण
अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार आदरणीय
स्व. अरुणकाका जगताप
थोर व्यक्तिमत्वास प्रथम पुण्यस्मरणादिनी
भावपुर्ण श्रद्धांजली..
अंबादास (लिंबाशेठ) नागरगोजे । बाबासाहेब (आप्पा) नागरगोजे । गहिणीनाथशेठ नागरगोजे
उद्योजक
नगरसेवक, म.न.पा.अहिल्यानगर
उद्योजक
अंबिका उद्योग समुह । शिव गौरांश पेट्रोलियम MIDC, अहिल्यानगर